२० मे १९६७
चाळीस पैसे

# माणूस




सरकारला मार्गदर्शन करण्याच्या व नवी समाजरचना घडविण्याच्या दृष्टीने काँग्रेसला महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे. . . !

—सरकार व पक्ष यांच्या संबंधावरील चर्चा—नवी दिल्ली



# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

चतुर्थ आवृत्ती, सचित्र

प्रसिद्धीनंतर : मूल्य रुपये
चाळीस किमान

प्रसिद्धीपूर्व : मूल्य रुपये
सत्तावीस फक्त

पोस्टखर्च : रुपये तीन वेगळा

प्रसिद्धीपूर्व ग्राहक नोंदणीची
अखेरची मुदत : ३१ मे १९६७

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे

अंक : सेहेचाळीसावा

किंमत : चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे

अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


## पत्रमैत्री

वैशाख शु॥ ३, शके १८८९
'अक्षय्य तृतीया'

प्रति
श्री. श्री. ग. माजगावकर
संपादक 'माणूस'
सप्रेम नमस्कार

व्होल्गा
लाल केव्हा होणार ?

आपला
दर गुरुवारी 'माणूस' खरेदी
करून वाचणारा वाचक —

[ लेखकाचा व्होल्गाचा प्रवास नुकताच आटोपला आहे. गंगा ओलांडून आता तो यमुनातीरी वसलेल्या दिल्ली नामक नगरीत मुक्काम ठेवून आहे. यमुना जर आड आली तर काय होते हे पानिपतच्या उदाहणावरून, 'माणूस' दर गुरुवारी खरेदी करून वाचणाऱ्या वाचका ! तुला ज्ञात असेलच. आशा करू या, की लेखकाला यमुना अडवणार नाही आणि तुझं पानिपतही होणार नाही.

लाल रंग जरी उतावीळपणाचा असला तरी आपण सारे भारतीय आहोत हेही विसरू नकोस — बा गुरुवारच्या वाचका ! ] —सं.

# मा र्ग

ज्या मातीच्या जागरणासाठी सर्वांचा आज एवढा आटापिटा सुरू आहे, निदान असला पाहिजे, तिचा प्रत्यक्ष स्पर्श, अंगसंग इतका खुपणारा, रुतणारा असावा ? जिला माता म्हणून एवढ्या भक्तिभावाने वंदिले जाते ती वास्तवात एवढी कठोर, एवढी भरड वाटावी ? हिला मातृत्व केव्हा व कसे प्राप्त झाले ! सर्वच मानवांना, सर्वच कालात ही सारखीच पवित्र वाटत आली आहे काय ? आज इथे तर उद्या तिथे भटकणाऱ्या लमाणांच्या तांड्यांना जमीन ही 'काळी आई' वाटते का ? आदिवासी समाजाची जमिनीकडे पाहण्याची भावना वेगळीच असते असे त्या समाजाचा विशेष अभ्यास केलेले लोक सांगत असतात. का मानवी समाज भटक्या टोळ्यांच्या अवस्थेतून शेतीवाडीच्या अवस्थेत उत्क्रांत झाल्यानंतरच भूमी ही त्याला देवतास्वरूप भासू लागते आणि कृषि-संस्कृतीच्या अस्तानंतर ही भावना लोप पावते ? उद्या वैज्ञानिक प्रगती-मुळे अवश्य ते अन्नपाणी समुद्रातून किंवा केवळ वातावरणातूनच मनुष्यमात्राला उपलब्ध होऊ शकले किंवा अन्य काही मार्गाने भुकेचा परिहार झाला तर आज जसे मैलोन् मैल विस्तारलेल्या रेताड पण निरुपयोगी वाळवंटाकडे आपण पाहतो तसेच जमिनीकडेही पाहू लागू काय ? वेदांतला ऋषी म्हणतो, "माता भूमी, पुत्रोऽहं पृथिव्या"— "भूमी माझी माता आहे, मी तिचा पुत्र आहे." आता आपण 'वंदे मातरम्' म्हणतो. पण आपल्या केवळ पादस्पर्शाने ती अवमानित होईल, दु:खित होईल, म्हणून वेदांतील ऋषी प्रात:काळी उठल्याउठल्याच क्षमस्व मे ! क्षमस्व मे ! म्हणून जिला विनम्र भावाने शरण जातो ती माता पृथ्वी आणि रिपुदलसंहारार्थ जिला आपण सभासभातून आवाहन

श्री. ग. मा.



करतो ती सुजला, सुफला, सुस्मिता, शुभदा, वरदा माता भारती—मातृत्व-कल्पना समान असली तरी आशय किती भिन्न आहे ! प्राचीन काळची ती विशाल सगुणमूर्ती आधुनिक काळात अशा लहान रूपात का प्रकट व्हावी ? ही सगुणरूपे लहानमोठी का होतात, का बदलत असतात !

..........................................................................................

पण प्रहरभरच्या सहवासामुळे हा अंगसंग आता सुखद वाटू लागला होता. उठावेसे वाटत नव्हते पण उठणे भाग होते. कितीही वेग घेतला असता तरी तीस मैलांचे सकाळी ठरवलेले उद्दिष्ट यापुढे गाठणे शक्य नव्हते. निदान वीस मैलांवरचे ठिकाण तरी गाठावे म्हणून चाल सुरू केली होती, पण वेग हळूहळू मंदावतच होता. ठणका वाढत होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांचे कुतूहलही सकाळपेक्षा वाढले होते, कारण पोशाखात आणखीनच क्रांती घडली होती. डोक्यावर उन्हाळी टोपी चढली होती. डोळ्यांवर गॉगल होता, बुशकोट निघाला होता—कुणी हौशी अमेरिकन टीनएजर ! रंग फक्त खास भारतीय ! माझा खिसा चांगलाच गरम असणार या कल्पनेने एक इसम चहासाठी पैसे मागून मागून दमला पण मला काही पाझर फुटेना. शेवटी त्याची सहानुभूती जागी झाली व 'निर्वासित का ? कुठून निघालात ?' अशी त्यानेच मला पृच्छा केली. मी 'हो' म्हटले आणि ब्याद कटवली. वेग आणखीनच मंदावला. वीस मैलांचा मुक्कामही दूरचा वाटू लागला. निदान वाटेवरची एखादी बऱ्यापैकी वस्ती तरी ! नाही. एकदमच हातपाय गळाले. जीवाची तगमग सुरू झाली. असे एकदमच त्राण का जावे ? ऊन्ह बाधले का ? ज्या

वेळात घरी आपण आरामात वर्तमानपत्रे वाचीत लोळत पडायचे त्या वेळी आपण भर उन्हातून चालत राहिलो हे. चुकले का ? कुणास ठाऊक. आपल्याकडे यावर गोळी वगैरे काही नाही, औषध नाही. थांबले पाहिजे. जेमतेम रस्त्याच्या कडेला लागलो. बांध ओलांडून पलीकडे शेतात जाणेही अशक्य झाले. दिले उंचवटयावरच अंग झोकून. एवढेच पाहिले की हाकेच्या अंतरावर एक-दोन माणसे शेतात काम करताहेत, पलीकडे दोन खोपटी आहेत, विहीरही असावी. रात्र काढायचीच झाली तर अगदीच चिटपाखरांच्या संगतीत नको.

लोळणच घ्यावी लागावी एवढी उलघाल पूर्वी केव्हा झाली होती ! आठवले. राजगडावरचा आचार्य भागवतांचा शेतीप्रयोग पाहायला गेलो होतो तेव्हा उन्हाने असाच कलमललो होतो. कोलमडलो होतो. खरोखर भागवतांच्या प्रयोगाचा अधिक विचार आणि विस्तार का होत नाही! त्यांना संपूर्ण वेड्यात काढणारे जाणकार मला भेटलेले आहेत, त्यांना लाभलेली तज्ज्ञांची प्रशस्तीही मी पाहिलेली आहे. पावसाचे पाणी वाहू जाऊ न देता जमिनीत मुरवून शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे हा जर भागवतांच्या प्रयोगाचा मुख्य आशय असेल तर त्यावर अधिक संशोधन का होऊ नये ? बर्वे समितीचा अहवाल सांगतो, की आहे ते पाण्याचे सर्व साठे उपयोगात आणले तरी महाराष्ट्रातील फक्त तेवीस टक्के जमिनीला पाणीपुरवठा होऊ शकेल. म्हणजे आपला मुख्य प्रश्न कोरडवाहू शेती पिकवणे हाच आहे. धरणे, कालवे यांच्यामुळे होते आहे असे की, ८० टक्के कोरडवाहू शेतीत काहीच प्रगती नाही आणि ऊसाच्या, तंबाखूच्या व इतर नगदी पिकांच्या बागायती मात्र विषमतेची साक्ष पटवत अधून मधून वर येतात ! कोरडवाहू दुर्लक्षितच राहते. आणि हा कोरडवाहूचा मुख्य प्रश्न पावसाच्या पाण्यालाच साठवून, मुरवून ठेवण्याच्या चळवळी हाती घेतल्याशिवाय अन्य कशाने सुटेल असे वाटत नाही. बांधबंदिस्ती, वृक्षारोपण या चळवळी सुटीत विद्यार्थ्यांना गावकऱ्यांच्या मदतीने हाती घेण्यास खूप वाव आहे. एरव्ही गाव उदासीन असते. पण अशी बाहेरून कुमक आली, ताजे विचार आले, नव्या प्रेरणा आल्या तर गावकऱ्यांची साथही मिळते असा बहुतेक ठिकाणचा अनुभव आहे. सरकारी यंत्रणा नेमकी येथेच अपुरी पडते. योजना चांगल्या असतात, अधिकारीही

कित्येकदा प्रामाणिक असतात. पण सारा व्यवहार निर्जीव असतो. गावाचे मन प्रथम तयार करण्यांचे, आपलेसे करण्याचे महत्त्व पटलेले नसते, पटले तरी सरकारी चाकोरीतून तसा स्पर्श करण्यास फारसा वावही नसतो. म्हणून कित्येकदा असे वाटते की, हे काम आता खाजगी संस्थांनी, वजनदार व्यक्तींनी हौस आणि गरज म्हणूनही हाती का घेऊ नये ? सरकारने अवश्य ते सर्व साहाय्य, सामग्री तत्परतेने पुरवावी. थोडेफार नियंत्रणही असावे. पण उभारणीची जबाबदारी समाजातल्या इतर सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक संस्थावर टाकण्याचा प्रयोग जरूर करून पाहावा. कोल्हापूरला कुठल्यातरी एका कॉलेजने विद्यार्थ्यांच्या मदतीने गेल्या काही वर्षांपासून नवीन जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयोग चालवला आहे असें वर्तमानपत्रात वाचल्याचे आठवते. हा प्रयोग पाहायचा, हेही ठरले. योग अद्याप आला नाही एवढेच. असे प्रयोग इतरत्र व्हायला काय हरकत आहे ? नाही तरी एन्. सी. सी. वर नउशे कोटी रुपये खर्च केले आणि ते पाण्यात गेले असे होतेच. शिक्षणसंस्थांनी काळाची गरज ओळखून, फारशी सक्ती न करता जेवढे विद्यार्थी आपण-हून तयार होतील त्यांच्या मदतीने, गावकऱ्यांना बरोबर घेऊन असे शेतीविकासाचे प्रयोग करण्यासारखे आहेत. सगळ्यांसाठी सुंदर अशी कोणतीच योजना नसते. पण सक्तीने चांगल्या योजनांचेही मातेरे होते असा अनुभव आहे. म्हणून शक्य तो भर स्वयंप्रेरणेवर हवा, गुणवत्तेवर हवा. काम लहान का मोठे उभे राहते हा प्रश्न गौण समजला जावा. शास्त्रशुद्ध, टिकाऊ आणि काम करणाऱ्याच्या शक्तीबुद्धीचा विकास साधणे हे उद्दिष्ट हवे. भले चार गोष्टी कमी होतील, पण होतील त्यांचा अभिमान बाळगता आला, त्यापासून इतरांना प्रेरणा लाभली तरी खूप साधले.

शिक्षणसंस्थांप्रमाणेच आमच्या वसंतराव वैद्यांसारखे सामाजिक कार्याची हौस असणारे उद्योगपती-कारखानदारही प्रयोगक्षेत्रे उभारू शक-तात ! एकमेकांची तुलना, स्पर्धा, देवाणघेवाण होईल. जरा काही नवे रक्त या क्षेत्रात सळसळू लागेल. विकासाची सर्व जबाबदारी सरकारने स्वतःच्या एकट्याच्या शिरावर घेऊन या योजनांद्वारे समाजाच्या मानसिक साम-र्थ्याची किती कोंडी करून टाकली आहे ? ज्यात समाज माझ्यासारखा

असा लोळागोळा होऊन निपचित पडतो त्याला म्हणायचे मात्र समाजवादी नियोजन ! समाजवादी का सरकारी ? समाजवाद वेगवेगळ्या ठिकाणच्या परिस्थितीप्रमाणे वेगवेगळ्या मार्गांनी, वेगवेगळ्या प्रकारांनी आणण्याची दृष्टी अधिक वास्तववादी ठरणार नाही काय ! आमच्या समाजवादाच्या कल्पना, रशियन ठोकळ्यावरून बनलेल्या आहेत. हे ठोकळ्यांचे आकर्षण केव्हा संपणार ! आम्ही स्वतंत्र विचार, स्वतंत्र मार्ग केव्हा पत्करणार !

थोरामोठ्यांच्या विचारांवरही या परकीय आदर्शांचा पगडा. ' माणूस प्रतिष्ठान 'चा सुपे-प्रयोग सुरू झाला. स. गो. बर्वे यांचे तिकडे लक्ष गेले. मुंबईच्या निवडणुकीच्या धामधुमीतही थोडा वेळ काढून यासंबंधी त्यांनी आस्थेने चौकशी केली, त्यामागील भावनेचा आदर केला. पण सल्ला असा दिला, की 'ही कामे करायला सरकार आहे, तुम्ही कशाला निष्कारण तुमची आधीच तुटपुंजी असलेली आर्थिक शक्ती या कामासाठी खर्च करता !' मला त्यांच्याशी यासंबंधी सविस्तर चर्चा करायची होती. नियोजनविषयक त्यांच्या खोल व्यासंगाचा माझ्या विचारांशी, अनुभवांशी ताळमेळ बघायचा होता. सारी सत्ता आणि मत्ता जर सरकारजवळ आहे तर पंचवार्षिक योजना अपेशी का ! जनतेचे पाठबळ नाही म्हणून सरकारने खंतावण्याचे कारण काय! जनतेच्या पाठबळाशिवाय योजना यशस्वी होत नाहीत हे एकदा ध्यानात आल्यावर हे पाठबळ मिळविण्याची काय सोय केलीत ! चीनमध्ये जनतेच्या आदरास व विश्वासास पात्र ठरलेला कम्युनिस्ट पक्ष होता म्हणून हा जनतेच्या पाठबळाचा प्रश्न ते सहज सुटला. रशियात सर्वच विकास सरकारने करण्याची पूर्वापारची, परंपरा होती. तेथे भांडवलशाहीदेखील झारने आणलेली आहे. इंग्लंड-अमेरिकेप्रमाणे काही धाडसी, कल्पक व कष्टाळू व्यक्तींच्या स्वयंप्रेरित धडपडीतून ती विकास पावलेली नाही. आपल्याकडे या देशांच्या लोकशाहीच्या कल्पना रुजवण्याचा एकीकडे प्रयत्न करायचा आणि दुसरीकडे आर्थिक क्षेत्रात मात्र चीन-रशियाचे तंत्र उचलायचे हे कसे जमणार ! इथे जनमानस विचारात न घेता केलेले नियोजन कसे यशस्वी होणार ! ......

हे सगळे मला बर्व्यांशी नीट बोलायचे होते. पण हा सुजन आता आपल्यात नाही, तेव्हा काय बोलणार ?

* हा सुजन पुरंदऱ्यांच्या शिवचरित्राचा एक चाहता होता. "It's a character building book" हे बर्वे यांच्या तोंडचे शब्द. घरोघर हा ग्रंथ जावा ही यांची तीव्र इच्छा. महाराष्ट्र शासनाने या ग्रंथाची स्वस्त आवृत्ती काढावी यासाठी बर्वे यांनी खटपटही केली. पण यांचेच झाले थोडे आणि त्यात हे शिवचरित्राचे घोडे! ते दिल्लीला गेले, इतर कुणालाच आस्था दिसली नाही, आम्हीही नसलेली आस्था निर्माण करण्याची पर्वा बाळगली नाही आणि अशा रीतीने शिवचरित्राच्या स्वस्त आवृत्ती योजनेची इतिश्री झाली. पण छत्रपतींच्या पुण्याईवर, नावावर राज्य करणाऱ्या शासनात छत्रपतींच्या चरित्र-चारित्र्यप्रसारकार्यासाठी खटपट करणारा बर्वे हा एकच मंत्री निघावा, इतरांनी दरबारी देखावे मांडावेत, हे नमूद करण्यास अत्यंत खेद होत आहे.

* हा सुजन मुंबईच्या निवडणुकीत मेनन यांचेविरुद्ध निवडून यावा असे आपल्याला जरूर वाटत होते. पण मेनन कम्युनिस्ट आहेत ही बर्वे यांची भूमिका 'माणूस'ला साफ नामंजूर होती. ज्या लोकशाही समाजवादाचे पाईक म्हणून बर्वे निवडणूक लढवीत होते तीच मेनन यांची विचारसरणी होती व आहे. फक्त या म्हाताऱ्याची उपयुक्तता नेहरूंनंतर व एकदा काँग्रेसचा त्याग केल्यावर संपली आहे, असे आपल्याला वाटत होते. मेनन आता लिहीत का नाहीत? विशेषतः चिनी आक्रमणाबाबत, लंडनमधील भारतीय स्वातंत्र्यचळवळीबाबत, त्यांच्या सहवासात आलेल्या जागतिक कीर्तीच्या व्यक्तींबद्दल, स्वतःबद्दल! त्यांच्या पार्लमेंटमधील खुर्चीपेक्षा या लिखाणाचा भावी पिढ्यांना अधिक उपयोग होईल.

* हा सुजन रसिकही होता, बरं का! पुरंदऱ्यांनी जेव्हा त्यांना सांगितले, की मस्तानी ही छत्रसालाने बाजीरावाच्या पराक्रमावर फिदा होऊन त्याला नजर केलेली सुंदरी नसून दलालाकडून बाजीरावानेच खरेदी केलेली एक खुबसूरत नाची पोर होती, तेव्हा भारताच्या नियोजन मंडळाचा हा सदस्य खेदाने एकदम उद्‌गारता झाला, "नका सांगू बुवा पुरंदरे—हे ऐतिहासिक सत्य असले तरी. It's a great romantic loss of history."

पण शेतात काम करणारे हे दोन सुजन आपल्याकडे लक्ष का देत नाहीत? उठून चालू लागण्यासाठी आपण दोन-तीन वेळा केलेली केविलवाणी धडपड यांनी पाहिली नसेल का? नाही कशी? पाहिली असणारच. पण 'धरतीची लेकरं' आहेत ही. सहजासहजी विरघळणार आहेत थोडीच! उलट आपण झिंगून, झोकांड्या जाऊन या ओहोळात पडलो आहोत अशीच त्यांची समजूत झाली असणार! आपल्यालाच जावे लागणार तेथवर हे उघड आहे!

ठरले. ठीक सहावर काटा आला की उठायचे हं! नक्की.

[अपूर्ण]

# धर्मातीत राज्याची द्वाही !

गेल्या फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीतील शेवटचा अंक नुकताच समाप्त झाला. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी देशात या वेळी जेवढा प्रचंड उत्साह आणि उत्सुकता दिसून आली तेवढ्या उत्साहाचा पूर्वीच्या तीन निवडणुकांमध्ये मागमूसही नव्हता. या वेळच्या उत्साहाला कारणही तसेच होते. आतापर्यंत काँग्रेसेतर पक्षांना लोकसभेत काय किंवा विधानसभेत काय नाममात्र जागा मिळत असत. या खेपेला मात्र सारेच चित्र बदललेले आहे. लोकसभेत काँग्रेसचे २८० तर विरोधी पक्षांचे २४० सदस्य आहेत. याशिवाय आठ राज्यांमध्ये काँग्रेसपेक्षा विरोधी पक्षीय किंवा अपक्षीय सदस्यांची संख्या अधिक आहे. या परिस्थितीमुळे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती या दोन सर्वोच्च महत्त्वाच्या पदांसाठी आपले उमेदवार उभे करण्याचे विरोधी पक्षांनी ठरविले व त्याप्रमाणे श्री. सुब्बाराव आणि प्रा. हबीब यांचे उमेदवारी अर्ज भरण्यात आले. विरोधी पक्षांचे वाढते सामर्थ्य लक्षात घेऊन या दोन पदांसाठी सर्वसंमत उमेदवार निवडावेत अशी सूचना प्रारंभी करण्यात आली होती. त्या दृष्टीने काँग्रेस-नेते व विरोधी पक्ष-नेते यांच्यांत प्राथमिक स्वरूपाचे बोलणेही झाले. परंतु प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांना व्यक्तिश: ही गोष्ट तितकीशी पसंत नव्हती. म्हणून वाटाघाटीची वेळ टळून गेल्याची सबब पुढे येऊन ही बोलणी अर्ध्यावरच आटोपली. यानंतर काँग्रेस पक्षाने आणि विरोधी पक्षांनी आपापले उमेदवार मुक्रर करावेत ही गोष्ट क्रमप्राप्त ठरली.

काँग्रेस पक्ष-नेत्यांच्या बैठकीत यासंबंधी विचारविनिमय सुरू झाला तेव्हा डॉ. राधाकृष्णन व डॉ. झाकिर हुसेन यांनाच अनुक्रमे राष्ट्रपतिपदासाठी व उपराष्ट्रपतिपदासाठी उभे करावे अशी सूचना श्री. कामराज यांनी मांडली. परंतु उपराष्ट्रपतिपदावरून निवृत्त होण्याचे आपण ठरविले असल्याचे डॉ. झाकीर हुसेन यांनी या सुमारास जाहीर केले होते. त्यामुळे कामराज यांची सूचना मान्य होण्यासारखी परिस्थिती राहिली नाही. तरीही निदान डॉ. राधाकृष्णन यांनी आणखी पाच वर्षे राष्ट्रपतिपदावर राहावे हा आपला आग्रह कायम असल्याचे कामराज यांनी सांगितले. परिस्थिती निकरावर आली तेव्हा एकट्या इंदिरा गांधी यांनी डॉ. झाकिर



## स्त्रीहट्ट!

हुसेन यांनाच काँग्रेस पक्षाने राष्ट्रपतिपदासाठी उभे केले पाहिजे, असा आपला आग्रहं अगदी जोरदार शब्दांत व्यक्त केला; इतकेच नव्हे तर कामराजांची सूचना धुडकावून देऊन हा आग्रह आपल्या सहकाऱ्यांकरवी मान्य करून घेतला. अशा रीतीने पक्षांतर्गत वाटाघाटींची पहिली फेरी श्रीमती इंदिरा गांधी यांनी जिंकली. शेवटी राष्ट्रपतिपदासाठी डॉ. झाकिर हुसेन व उपराष्ट्रपतिपदासाठी श्री. व्ही. व्ही. गिरी हे काँग्रेसचे उमेदवार ठरले.

या दोन उमेदवारांबाबत श्रीमती गांधी कोणतीही तडजोड करण्यास तयार

नाहीत असे आढळून आल्यानंतर सर्व विरोधी पक्षांना एकत्र येऊन आपले पर्यायी उमेदवार निवडणे आवश्यक ठरले व त्याप्रमाणे श्री. सुब्बा राव व प्रा. हबीब यांची नावे निश्चित करण्यात आली. श्री. सुब्बा राव यांनी तर या निवडणुकीसाठी सरन्यायाधीशपदाचे त्यागपत्रही देऊन टाकले. प्रा. हबीब सरकारी नोकर नसल्यामुळे त्यांच्यापुढे राजीनाम्याचा प्रश्न नव्हताच. उमेदवार निवडताना विरोधी पक्षीयांमध्ये जी एकवाक्यता दिसून आली ती मात्र पुढे टिकली नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षीय मतदार फोडण्याची पूर्वीची कल्पना विरघळली गेली व आपली एकजूट कायम कशी ठेवावयाची, असा प्रश्न निर्माण झाला; परंतु शेवटपर्यंत ती मतभेदांची फट कायम राहिली आणि काँग्रेस पक्षीय नेत्यांच्या अपेक्षेपेक्षाही अधिक यश डॉ. झाकिर हुसेन व व्ही. व्ही. गिरी यांना लाभले. काँग्रेस पक्षाचे दोन्ही उमेदवार पाडून इंदिरा गांधी यांच्या सरकारला आव्हान देण्याचा विरोधी पक्षीयांचा मनसुबा पार फसला. या निवडणुकीत इंदिरा गांधी यांची वैयक्तिक प्रतिष्ठा पणाला लागली होती; इतकेच नव्हे तर एका अर्थी संपूर्ण काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने या निवडणुकीला विशेष अर्थ प्राप्त झाला होता. त्यामुळे आपल्यात फाटाफूट होणार नाही याची काँग्रेस नेत्यांना खबरदारी घेणे भाग होते. त्याप्रमाणे त्यांनी योग्य ती काळजी घेतली व आपली मते फुटू दिली नाहीत. उलट विरोधी पक्षीय सदस्यांची संख्या व सुब्बा राव–हबीब यांना पडलेली मते या दोन गोष्टी लक्षात घेतल्या तर विरोधी पक्षांतील चाळीस एक सदस्यांनी तरी काँग्रेस उमेदवारांच्या बाजूने मतदान केल्याची वस्तुस्थिती स्पष्ट होते.

## पक्षोपपक्षांतील अविश्वास

या सर्व घटनांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की राज्य पातळीवर परस्पर-सहकार्य करणारे काँग्रेसेतर पक्ष दिल्लीत परस्परांच्या जवळ आलेले नाहीत. राज्य–सरकारांपुढील प्रश्न सोडविताना राजकीय विचारसरणीला फारसे प्राधान्य मिळू शकत नाही. एकतर या सरकारांचे अधिकार अतिशय मर्यादित आहेत. शिवाय जनतेच्या दैनंदिन गरजा चांगल्या रीतीने कशा पुरविल्या जातील याचा विचार करताना सर्वसंमत मार्ग निघू शकतो. परंतु केंद्रसत्तेचे स्वरूप तसे नाही. दिल्ली हातांत ठेवू शकणारा पक्षच खऱ्या अर्थाने साऱ्या देशाचे सर्वांगीण आर्थिक धोरण ठरवत असतो, परराष्ट्रांतील भारताची प्रतिमा साकार करीत असतो. त्यामुळे दिल्लीत वावरताना विरोधी पक्षीय सदस्यांची दिलजमाई झाली आहे असे दृश्य दिसत नाही. अगदी संसद–भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात फेरफटका मारला तरीही प्रत्येक पक्षाचे वेगवेगळे गट चहापाण्याच्या निमित्तानेदेखील एकत्र आले आहेत, असे सहसा आढळत नाही. एक गोष्ट तर स्पष्ट आहे की काँग्रेसजवळची केंद्रसत्ता हिसकावून घेण्याचे सामर्थ्य आज कोणत्याच पक्षांत नाही. शिवाय राज्यांपुरता यशस्वी ठरलेला संयुक्त मंत्रिमंडळाचा प्रयोग केंद्रसत्तेच्या वाटपाकरिताही यशस्वी

ठरेल असा संभव फारच अल्प असल्याची जाणीव प्रत्येक विरोधी पक्षाला झालेली आहे. यातच कम्युनिस्टांचे हिकमती धोरण इतर पक्षांना व विशेषतः जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांना नीट माहीत आहे. आज काँग्रेसला सत्तेवरून दूर करण्यासाठी जनसंघाचे किंवा स्वतंत्र पक्षाचे सहकार्य घेणारे कम्युनिस्ट केव्हा आपली चाल बदलतील याची कोणालाच खात्री वाटत नाही. शिवाय सत्ताप्राप्तीसाठी कोणत्याही सूक्तासुक्त उपायांचा अवलंब करण्यास त्यांच्या पोथीत मनाई करण्यात आलेली नाही. तिकडे रशिया व चीन यांचे भांडण जुंपल्यापासून आपल्या देशी कम्युनिस्टांतही मॉस्कोवादी आणि पेकिंगवादी अशी फूट पडली व त्यांचे शक्तिसामर्थ्य द्विधा झाले. त्यामुळेच हा पक्ष आज ' प्रतिगामी शक्तीं 'शी सहकार्य करीत आहे. कामगार-क्रांतीच्या लाल भाषेला तूर्त आवर बसला आहे तो या परिस्थितीपायीच. अर्थात जनसंघ-नेतेही कम्युनिस्टांबद्दल इतक्याच कडव्या शब्दांत बोलताना आढळतात. या अविश्वासाच्या वातावरणामुळे सुब्बा राव यांचा प्रचार हिरीरीने होऊ शकला नाही व त्याचा परिणाम असा झाला की गेल्या दोन-तीन महिन्यांत आपली विस्कटलेली प्रतिमा काँग्रेस पक्ष डॉ. झाकिर हुसेन यांच्या विजयामुळे चांगल्या रीतीने सावरू शकला. ' या विजयामुळे सर्वांत अधिक कोणाला आनंद झाला असेल तर तो मलाच ' असे जे इंदिरा गांधी म्हणाल्या ते यामुळेच.

## साशंक स्वागत

नवे राष्ट्रपती डॉ. हुसेन हे मुसलमान असले तरी पूर्वायुष्यात ते सदैव मुस्लिम लीगशी फटकूनच वागले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे छागला आणि हुसेन यांची प्रकृती एकच आहे. दोघांनाही इस्लामच्या शिकवणुकीचा रास्त अभिमान असला तरी हा अभिमान वैयक्तिक जीवनाची सीमा ओलांडून राजकारणात घुसलेला नाही. एक विद्याव्यासंगी आणि काहीसे अलिप्त व्यक्तिमत्त्व असेच डॉ. हुसेन यांचे वर्णन करण्यात येते. त्यांच्या विजयामुळे मध्यपूर्वेतील मुस्लिम राष्ट्रांबरोबरचे आपले संबंध अधिक दृढ करणे भारताला शक्य होईल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. शिवाय ' भारतातील मुसलमान समाज धोक्यात आहे ' या पाकिस्तानच्या प्रचारालाही आता आपोआपच खीळ बसेल. डॉ. हुसेन यांची राष्ट्रपतिपदी निवड करून भारताने आपल्या धर्मातीत राज्यव्यवस्थेची ग्वाहीच दिली आहे, अशी प्रतिक्रिया पाश्चात्त्य राष्ट्रांत व्यक्त करण्यात येत आहे. डॉ. झाकिर हुसेन यांच्या विजयामुळे आपल्या पदरात जो फायदा पडला आहे तो हा एवढाच. परंतु यामुळे वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. डॉ. झाकिर हुसेन काय किंवा महंमद करीम छागला काय, हे दोन्ही पंडित देशातल्या सर्वसामान्य मुसलमान नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत आहेत असे मानणे म्हणजे आत्मवंचना करून घेण्यासारखे आहे. भारत–पाकिस्तान युद्ध सुरू असताना मशिदींत होणाऱ्या प्रार्थना आणि प्रचार मुसलमान समाज या भूमीशी एकरूप झाला आहे याची

ग्वाही देत होता काय ? हिंदू समाजाने सहिष्णू जरूर असावे; परंतु हे औदार्य आत्मघातक ठरणार नाही, एवढी दक्षता अवश्य घ्यावयास हवी. आपल्यातील 'अतिविशालवाद्यांचा' उत्साह कोठवर जाईल हे सांगता येत नाही. मागे एखादा शौकतअल्ली किंवा एखादा आझाद कॉंग्रेसच्या व्यासपीठावर दिसला की हिंदु-मुसलमान प्रश्न सोडविण्यात आपण यशस्वी झालो असा दावा करण्यात येत असे; परंतु तो किती पोकळ होता हे स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या घटनांनी सिद्ध केले आहे. अशा परि-

# आवाहन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे साहित्य ही एक स्वयंसिद्धी आहे. मराठी भाषेचा तर तो एक अनमोल ठेवाच आहे. काव्य, नाटक, निबंध, आत्मचरित्र, इतिहास, कादंबरी.......अशा विविध वाङमयप्रकारांत त्यांनी दैदीप्यमान भर घातलेली आहे. या समग्र साहित्याचा विविध दृष्टिकोनांतून विचार व्हावा ह्या हेतूने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची संलग्न संस्था म्हणून "स्वा. सावरकर–साहित्य अभ्यास मंडळ" वर्षप्रतिपदेला (दि. १०–४–१९६७) स्थापन करण्यात आले. अभ्यास मंडळाच्या वतीने प्रतिवर्षी सावरकरांच्या जन्मदिनानिमित्त विद्वान वक्त्यांची तीन सलग व्याख्याने घडवून आणून जमल्यास ती प्रसिद्धही करण्याचा विचार आहे. यासाठी सुमारे पंधराशे रुपये खर्च प्रतिवर्षी येईल. त्याचप्रमाणे सावरकरांच्या साहित्याशी संबंधित अशा विषयांवर प्रबंध वाचनाचे कार्यक्रम घडवून आणण्याचाही विचार आहे. सावरकरांचे साहित्य जरी आठ खंडांत समाविष्ट असले, तरी खंडरूपाने प्रसिद्ध करण्यासारखे निबंध, पत्रव्यवहार, इत्यादी वाङमय अद्यापि अप्रकाशितच आहे. त्याचा संग्रह करण्याचे कार्यही आहेच. सावरकरांनी जसे उदंड लिहिले, तसेच त्यांच्यासंबंधी प्रसिद्ध झालेले अमाप लिखाण नियतकालिकांच्या अंकांमधून विखुरलेले आहे. ते एकत्रित करून ह्या सगळ्याचा संग्रह संग्रहालयामध्ये एका अलग अशा स्वा. सावरकर विभागात करणे आवश्यक आहे.

ह्या कार्याला लागणारा पुरेसा कायम निधी उभा करणे अगत्याचे आहे. किमान एकावन्न सहस्रांचा निधी गोळा करण्याचे लक्ष्य मंडळासमोर आहे. आपण ह्या

स्थितीत सामाजिक अभिसरणाची ही प्रक्रिया एकांगी ठरणारे नाही एवढी दक्षता घ्यावयास नको काय ?

डॉ. झाकिर हुसेन यांच्या विजयाबद्दल भारतीय नागरिक म्हणून आनंद व्यक्त करीत असतानाच मूल प्रश्नाकडे डोळेझाक होता कामा नये, एवढे आपण उमगलो तर वास्तवापासून आपण फार दूर जाणार नाही.

सदाशिव पेठकर

---

# स्वातंत्र्यवीर सावरकर–साहित्य अभ्यास मंडळ

निधीस सढळ हाताने साहाय्य करून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साहित्यरूपी स्मरण चिरंतन ठेवण्यासाठी सहकार्य कराल, अशी आशा वाटते.

देणगीदार मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असताना अभ्यास मंडळाचे नित्याचे सदस्य म्हणून वार्षिक पाच रुपये वर्गणी देणारे वर्गणीदार नोंदविण्याचे कामही मंडळाने हाती घेतलें आहे. देणगीदार हे ह्या मंडळाचे सर्वसाधारण सभासद राहतील व त्यातूनच कार्यकारी मंडळाची निवड प्रतिवर्षी करण्यात येईल, अशी योजना आहे. आपण ह्या योजनेस संपूर्ण सहकार्य कराल असा विश्वास ह्या मंडळाला वाटतो.

ह्या कार्याविषयी आस्था असणाऱ्या आपल्या स्नेही मंडळींचे पत्ते आपण ह्या मंडळाकडे कळवावेत अशी आमची नम्र विनंति आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **द. बा. कुलकर्णी** | **गि. स. भावे** | **अ. स. भिडे** | **अनंत काणेकर** |
| कोषाध्यक्ष | कार्यवाह | **व. दि. कुलकर्णी** | अध्यक्ष |
| | | **सुधीर फडके** | |
| | | उपाध्यक्ष | |

प्रकाश मोहाडीकर, गो. रा. परांजपे, बाबूराव फणसळकर, रा. म. आठवले, मधुकर पेठे, म. के. जोशी, दि. वि. गोखले, विद्याधर गोखले, दत्तप्रसन्न काटदरे.

**स्वा. सावरकर–साहित्य अभ्यास मंडळ,**
द्वारा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
नायगाव क्रॉस रोड, मुंबई १४.

## विचार वारे

### □ आंतरराष्ट्रीय समाजकार्य

आंतरराष्ट्रीय प्रमाणावर समाजकार्य करणाऱ्या एका संस्थेचे प्रमुख नुकतेच दिल्लीला येऊन गेले. ही संस्था म्हणजे "ज्युनियर चेंबर" किंवा "जेसी." जेसीच्या भारत-सीलोन-नेपाळ विभागाचे प्रमुख स्मिथ एडवर्ड मूडी यांनी नुकत्याच दिलेल्या भारतभेटीत जेसीचे कार्य काय आहे व ते कसे चालते याची ढोबळ कल्पना दिली. प्रत्येक ठिकाणच्या जेसी शाखेला आपण कोठल्या प्रकारची समाजसेवा करावी हे ठरविण्याचा अधिकार असतो व ते ठरविण्याच्या कामी त्या शाखेला मदत मिळू शकेल, अशा सूचना करणे एवढेच आंतरराष्ट्रीय जेसीचे काम असते. जेसी–सदस्य ज्या ठिकाणी राहतात तेथल्या समाजाच्या आशा-आकांक्षा काय आहेत हे ओळखून त्यांच्याशी समरस होणे हे प्रत्येक जसीचे कर्तव्य असते; त्यामुळे समाज-सुधारणेचे एक प्रभावी साधन म्हणून आपली उपयुक्तता सर्वत्र पटविणे जेसीला शक्य आहे. त्या त्या समाजात जे सुधारणेचे कार्यक्रम चालले असतील त्यांचे स्फूर्ति-स्थान म्हणून जेसीने पुढे यावे, अशी अपेक्षा आहे. उदाहरणार्थ, भारतात जेसीने काही खेडी 'दत्तक' घेऊन तेथे समाज-स्वास्थ्य केंद्रे व इतर अशीच कार्ये चालविली आहेत. जेसीला पक्षीय राजकारणात स्वारस्य नाही. उलट समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांच्या विकासाला नीट वाव मिळेल, असे कार्य करणे हे जेसीचे ध्येय आहे. भारतात या संस्थेच्या विकासाला खूपच वाव आहे.

### □ बल्गेरियन दृष्टीतून भारत

बल्गेरियन कवी आणि बालवाङ्मय-लेखक ॲनास्टीस स्टोयानॉव्ह नुकतेच भारत-भेट देऊन गेले, तेव्हा आपण भारतीय आपल्या मायभूमीला भारत-माता म्हणतो हे त्यांना माहीत नव्हते–पण त्यांच्याही मनात नेमके तेच स्वरूप आले. ते म्हणाले, "मी जेव्हा भारताचा नकाशा पाहिला तेव्हा, माझ्या मनात एका स्त्रीचे चित्रस्वरूप उभे राहिले. तिचे मस्तक काश्मीरात आहे, एक हात बंगालमध्ये आहे, तर पाय केरळ-मद्रासमध्ये आहेत. मी या स्त्रीसाठी बल्गेरियाहून एक भरजरी रंगाचे उत्तरीय आणले आहे–कारण बल्गेरियाचा नकाशा काहीसा उत्तरीयासारखा दिसतो."

स्टोयानॉव्ह हे बल्गेरियन लेखक-संघाचे चिटणीस आहेत. हा संघ काय करतो? तो लेखकांना पैशासाठी सामान्य लेखन करण्याला लागू नये म्हणून त्यांना आर्थिक मदत देऊन उच्च दर्जाच्या लेखनाला प्रोत्साहन देतो. "पण मदतीला पात्र असे

चांगले लेखक कोण आहेत हे कसे ठरविण्यात येते ?" त्यासाठी ३०–३५ सदस्यांची एक समिती आहे. या समितीत लेखक, प्राध्यापक, विद्वान इत्यादी मंडळींचा समावेश असून ही समिती काव्य व इतर साहित्य-प्रकारांत कोण उदयोन्मुख लेखक आहेत यावर लक्ष ठेवीत असते.

बल्गेरियाच्या निरनिराळ्या प्रदेशांत प्रचलित असलेले लोककाव्य एकत्र करून त्याचा २० पुस्तकांचा संग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. पण आधुनिक बल्गेरियन काव्य लोककाव्याहून अगदी भिन्न आहे. ते बुद्धिवादी असून नवीन स्वरूपाच्या व नवीन आशयाच्या शोधात आहे. म्हणजे "काव्याने जुना राष्ट्रीय पोशाख टाकून देऊन आधुनिक, उपयुक्ततावादी व ठरीव ठशाचा पोशाख घातला आहे," असे म्हणता येईल.

या बल्गेरियन कवीची एक हृदयंगम कविकल्पना :

"बल्गेरिया हा देश इतका छोटा आहे की तो प्रत्येक सच्च्या बल्गेरियन माणसाच्या हृदयात सामावू शकतो."

## □ प्रवासाचे शास्त्र

जगातल्या इतर कुठल्याही देशापेक्षा भारतात प्रवासी मंडळींना दाखविण्यासारखे अधिक आहे, पण ही जाणीव जगभर पसरविण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे मत टॉमस कुक अँड सन या जगप्रसिद्ध प्रवास-संस्थेचे संचालक सेसिल गारस्टंग यांनी परवा दिल्लीच्या भेटीत प्रकट केले. "जंबो जेट" म्हणून ओळखली जाणारी महाकाय विमाने एकदा उडू लागली की आंतरराष्ट्रीय प्रवासाचा खर्च कमी होईल आणि अधिक लोक सहलीसाठी प्रवास करू लागतील. भारताने हॉटेलबांधणीच्या कार्यक्रमाचा विस्तार करताना हा मध्यम-वर्गीय टूरिस्ट लक्षात ठेवला पाहिजे. "कारण खालच्या वर्गाने प्रवास करणाऱ्या मंडळींना कमी खर्चाच्या हॉटेलात राहणे आवडेल."

दारूबंदीमुळे भारताचा टूरिस्ट व्यवसाय बुडाला आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे आहे. फार तर दारूबंदी ही परदेशी प्रवाशांच्या दृष्टीने एक गैरसोय आहे, असे म्हणता येईल.

### दुष्काळ विरुद्ध लठ्ठपणा


परदेशी वृत्तपत्रांतून पुष्कळदा भारताचे विकृत चित्रण करण्यात येते ते का, असा प्रश्न "न्यूजवीक" या सुप्रसिद्ध अमेरिकन साप्ताहिकाचे प्रतिनिधी आर्नॉड बॉर्चग्रेव्ह यांना नुकताच दिल्लीत करण्यात आला. त्यांचे उत्तर :

विकृत चित्रण म्हणजे नेमके काय ? या खंडप्राय देशात सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहणे कुठल्याही वार्ताहराला अशक्य आहे. दुसरे म्हणजे येथल्या दुष्काळाच्या बातम्यांना परदेशात प्रसिद्धी का मिळू नये ? जगाच्या एका भागात अन्न वाया जात असताना दुसऱ्या भागात लोकांची उपासमार व्हावी ही खरोखरीच नामुष्कीची गोष्ट आहे.

# नकली देखावे शब्दांचे हे

माझ्यासाठी तुझ्या डोळ्यांत आसवे
नकली देखावे काही नको–!
काही नको मला असे जरि आहे
तुझे जे जे आहे माझे फक्त–!
रागाच्या भरात शब्द जळतात
अभंगच नातं तुझं माझं–!
अभंगाचा भंग होईल कैसा
शब्द धोंडचा ऐसा झाला जरि–!
इथे आत्म्यालागी आत्म्याने बोलावे
नकली देखावे शब्दांचे हे !

–ना. दि. देशमुख



# स्वप्नदग्धा

काळोखाची संथ लय
पापणीत जाग ओली
आसवांच्या शिल्पावर
गंधावती भाववेली.
मी ही स्वप्नदग्धा अशी
शब्द मांडतात छळ
काळजाच्या नभाखाली
जळे पापणीचा तळ.
किती सांगावे शब्दांनी
दुःख काळजाएवढे !
पेटलेले अंगअंग
किती हुंगावे केवडे !

–राजा महाजन

# रत्नथेम्ब

पापणीच्या बांधातून
आसवांचा पूर येतो
गालावर रत्नथेम्ब
किती वेळ रेंगाळतो...!
अधरीच्या कडेवर
हट्टी बसतो रुसून
कधी गुलाब कळीत
जातो क्षणात मिळून...!
जातो क्षणात मिळून
बसे मनात येऊन
ठेवितो मी नेहमीच
त्याला हृदयी जपून...!

–अ. शे. देशमुख

# आस्वाद :

'नकली देखावे शब्दांचे हे' कवीला नको आहेत. पण पहिल्याच ओळीत संदिग्धता आली आहे. डोळ्यांत आसवे आली हेही जणू काही कृत्रिम झाले असे तर नाही ना कवीला म्हणायचे ? नसेल असे वाटते. पण स्पष्ट होत नाही. 'अभंगाचा भंग' या पुढला चरण तोकडा आहे. एकंदरीने कवी अद्वैताकडे जात आहे. शब्दा म्हटला की कुणीतरी दुसऱ्याला आपला मनोभाव कळवायचा म्हणजे दुसऱ्यापेक्षा काही वेगळे वाटते आणि ते शब्दांत व्यक्त करावयाचे. पण जिथे मन एकच आहे तिथे भावना, कल्पना वेगळ्या कशा असणार ? शब्दाने तडा जातो तो एकतेला. ना. दि. देशमुख यांना असे काहीतरी व्यक्त करावयाचे असावे.

राजा महाजन यांच्या 'स्वप्नगंधे'त सारा मसाला हाच आहे. पापणीत ओली जाग आहे, पापणीचा तळ जगतो आहे अशा अवस्थेत शब्द छळ मांडतात. म्हणजे काय होते ? शब्द द्वैत निर्माण करतात. मौनाचा बांध फुटला की सामान्यतः जमीन दुभंगते. आणि मग तू आणि मी अशी विभक्ता येते. प्रेमिकाला जर काही खुपत असेल, नकोसे असेल तर ते हेच. पण दुरावा निर्माण केला तरी शब्द दुसऱ्या व्यक्तीला मानसीचे दुःख सांगायला समर्थ असतात थोडेच ! ही आणखी एक व्यथा आहे. शेवटच्या दोन ओळींत जीवनव्यापी यातनेची उत्कटता अप्रत्यक्षपणे चांगली दाखविली आहे. शांतिशोधनाचा कुठलाही प्रयत्न वाया जातो असे एखादे दुःख असते.

'रत्नथेंब' या कवितेत पुनः आपण पापणीच्या प्रांतातच घोटाळत आहोत. पापणीच्या बांधातून फुटलेला एक रत्नथेंब गालावर ओघळतो. आणि अधरावर, गुलाबकळीत अशा वाटांनी जाऊन पुनः तो हृदयात येऊन स्थिरावतो. विजेचे असेच नसते का ? ती निघते तेथेच पुनः येऊन पोचते. अ. शे. देशमुख यांच्या या थेंबाबरोबर आपणही प्रवास करतो. अधराच्या कडेवर हा थेंब रुसून बसतो. या वर्णनातली सूचकता रम्य आहे. मात्र खटकते एकच की गुलाबकळीत मिळून गेलेल्या या थेंबाला मनात यायला कारण काय झाले ? कुठल्या प्रेरणेने तो तेथून निघाला ? हा एक दुवा थोडा संदिग्ध राहिला आहे. बाकी कवितेतले चित्रण हृद्य वाटते.

**—गोपीनाथ तळवलकर**

# आभाळ ओथंबून आलं होतं...

## विद्याधर भागवत

काल रात्री केलेल्या निश्चयानं मन हलकं हलकं झालं होतं. रात्री झोपही सुंदर लागली होती. उठल्यावर सकाळी प्रसन्न वाटलं.

गेली रात्र किशोरी हळदणकरनं मनाला फार छळलं होतं. खरं म्हणजे तिच्यासारख्या पापभीरू मुलीनं छळलं होतं, असं म्हणण्यापेक्षा माझ्या मनातील सद्हेतूनंच मला छळलं होतं, असं म्हटल्यास चालेल. माझ्यासारख्या सरळ मनाच्या आणि आदर्शवादी शिक्षकालादेखील या छळानं सोडलं नव्हतं.

आणि हे सारं किशोरीमुळं झालं होतं. पण तिच्यावर मी रागावू शकत नव्हतो; कारण यात तिचा तरी काय दोष ? एक सालस मुलगी गरीब असणं यात दोष आहे असं जर असेल, तर तिला दोषी, गुन्हेगार ठरविता येईल. गरिबीमुळं मनुष्याला अनेक विवंचना भेडसावतात हे मला माहीत आहे; पण गरिबीत सौंदर्य वाट्याला येणं हे महाभयंकर दु:ख आहे, याची जाणीव मला किशोरीमुळं मिळाली.

अशा एका मुलीचं जीवन सुखी करण्यासाठी माझ्या हातून काही करता आलं असतं, तर मला स्वत:ला आनंद वाटला असता. त्यासाठी मी पूर्ण विचारही करून ठेवला होता.

आणि या विचारांमुळंच माझ्या मनाला एक प्रकारचं समाधान लाभलं होतं. त्यामुळंच मनावरचा ताण नाहीसा झाला होता. झोप मस्त लागली होती. आणि सकाळही प्रसन्नतेनं उमलली होती.

आज शाळा सकाळची होती. सकाळी शाळेतून मी किशोरीच्या घरी जाणार होतो. एका मुलीचं कल्याण करण्याचा प्रयत्न करणार होतो.

खरं म्हणजे किशोरीबद्दल मला एवढी आपुलकी का वाटावी ते मला अजूनही समजलं नव्हतं. ती सुंदर होती; पण अशा सुंदर मुली त्या शाळेत कमी होत्या ? आणि माझ्या सारख्याला केवळ अशा सौंदर्यानं कधीच आकृष्ट केलं नव्हतं.

मी अविवाहित आहे. असे मोह माझ्या मार्गात येणं काही अशक्य नाही. मी स्वत:ला सद्गुणांचा पुतळा समजत नाही. मलाही सहजसुलभ मानवी भावना आहेत. पण केवळ स्त्रीसौंदर्याचं आकर्षण मला कधीच वाटलं नाही हे मला कबूल केलंच पाहिजे.

**किशोरी निष्पाप आहे. तिच्यावर असा अन्याय होऊ नये, असं मला मनापासून वाटत होतं. आणि ती? ती माझ्या अब्रूला जपत होती...**

किशोरीविषयी आपुलकी वाटावी यात तिच्या सौंदर्यापेक्षा अन्यच गुण होते. तिच्या डोळ्यांत कारुण्य होतं. डोळ्यांत नेहमी आभाळ भरून राहिलं आहे, असं वाटायचं. ते आभाळ बोलकं होतं. पण त्याचे शब्द त्या अवकाशातच कुठं गडप होत आहेत असं वाटायचं.

अशा मुलीला तिच्या भावी काळात सुख मिळावं, तिनं खूप शिकावं, ती विदुषी म्हणून चमकावी, असं सारखं सारखं वाटे.

किशोरीच्या घरची मला काहीही माहिती नव्हती; तेव्हाही हीच भावना मनात निर्माण झाली होती; वेगळीच गूढता निर्माण झाली होती.

आणि जेव्हा तिच्या घरच्या परिस्थितीबद्दल कळलं, तेव्हा ही भावना तर ज़ास्तच प्रबळ होत चालली.

पहिल्याच दिवशी मी त्या वर्गात पाय ठेवला होता, तेव्हा माझ्या डोळ्यांना किशोरीच दिसली. त्या वेळी तिच्या डोळ्यात जो कारुण्यपूर्ण भाव दिसला होता तो मी अजूनही विसरू शकत नाही. नवा शिक्षक वर्गात प्रथमच गेल्यावर वर्गात एक वेगळीच उत्सुकता टवटवलेली असते. मुलांच्या भिरभिरत्या नजरांतून त्या वेळी त्या नव्या शिक्षकाचं सारं व्यक्तिमत्त्व साठविण्याचा तो प्रयत्न असतो. हा अनुभव मलाही त्या दिवशी आला होता. नजरेच्या एका टप्प्यातून मी सारा वर्ग न्याहाळला होता. आणि त्याच वेळी या मुलीचे डोळे काही तरी करुण बोलून गेले. एक वेगळी समजूतदार दृष्टी. वय पाहावं तर काही फारसं मोठं ज़ाणवलं नव्हतं; पण त्या वयाला न शोभणारे तिचे डोळे मात्र त्या साऱ्या मुलांमुलींत वेगळ्याच जाणीवेचा ठसा ठेवून गेले.

पहिलाच दिवस होता तो.

वर्गाची तयारी कितपत आहे याची मला कल्पना नव्हती. त्यामुळं काय शिकवायचं याचा आराखडाही माझ्या मनात त्या वेळी नव्हता. काही तरी गप्पा मारून तास संपवावा अशा बेतानं वर्गात पाऊल टाकलं होतं.

साऱ्या वर्गात उत्सुकतेची अधिरी फुलपांखरं भिरभिरली. आणि माझ्यापाशी स्थिरावली.

मुलांना खाली बसविलं. सर्वजण एकदम खाली बसले. शांततेचे क्षण वर्गात एकाएकी दरवळले. मी चारी बाजूंना नजर फेकली. सर्वत्र नवलाईची दुनिया फाकलेली दिसली.

मी शिकवणार कसा, बोलणार कसा, कोणता पाठ प्रथम घेणार याचा शोध घेण्यात सारे किशोर दंग होते. मी ते ओळखलं होतं. मलाही वाटलं, एखादा चांगलासा धडा सुरू करावा म्हणजे मुलांची निराशा होणार नाही.

पहिल्यांदाच पाडलेलं इम्प्रेशन कायम टिकणार होतं. एकदा वाटलं, प्रथम मुलांना नावं विचारून त्यांची ओळख करून घ्यावी. पण लगेच एका शिक्षकमित्रानं दिलेला इशारा मला आठवला. त्यानं मागचं एक उदाहरण देऊन मला बजावलं होतं, त्यामुळं मी बराच सावध झालो होतो.

मागं एकदा म्हणे एका नव्या शिक्षकानं नावं विचारण्यात बराच वेळ खर्च केला होता. पर्यवेक्षक बाहेर उभे होते. तास संपल्यावर त्यांनी त्या शिक्षकाला आपल्याकडे बोलावून विचारलं होतं,

" हे पाहा, हा तास किती मिनिटांचा असतो ? "

" पस्तीस. " त्यानं सहज दिलं होतं.

" पस्तीस मिनिटांतून मुलांची नावं विचारण्यात तुम्ही किती वेळ खर्च केलात?"

" विद्यार्थ्यांची ओळख व्हावी म्हणून–" तो शरमून बोलला.

" ते खरं आहे." आवाजात खालचा नरमाईचा स्वर आणून त्यांनी म्हटलं, "ओळख पुढं आपोआप होते. पण त्यासाठी पंधरा-वीस मिनिटं गमावण्याची आमच्या शाळेची रीत नाही, मास्तर ! आपल्याला हे समजावं म्हणून केवळ सूचना दिली इतकंच, हेडसरना हे आवडणार नाही. तासातल्या प्रत्येक मिनिटाचा उपयोग झाला पाहिजे. नव्हे का ? "

बिचारा शिक्षक खाली मान घालून निघून गेला होता.

माझ्या त्या शिक्षकमित्राचे मी मनातल्या मनात त्या वेळी आभार मानले होते. आणि पहिल्या दिवशीच मी सावधानतेनं वागायचं ठरविलं होतं. कारण माझ्यासमोर दोन समस्या होत्या.

माझ्या पूर्वी येऊन गेलेल्या मराठीच्या शिक्षकांनी शाळेत एक वेगळंच वजन ठेवलं होतं. त्यांच्याबद्दल मुलांच्या मनात नितांत आदर होता. गावात अनेकदा माझ्या कानी हे आलं होतं; तसा आदर मला मिळवायचा होता. एकापरीनं हे मला आव्हान होतं. निघून गेलेले शिक्षक एक प्रख्यात साहित्यिक होते. त्यांची प्राध्यापक म्हणून एका कॉलेजमध्ये नेमणूक झाल्यामुळे त्यांनी शाळा सोडली होती. त्यांची परंपरा टिकवून धरायची म्हणजे एक मोठं कठिण काम होतं. मुलांचं प्रेम मला संपादन करायचं होतं. एक चांगला शिक्षक म्हणून मला नव्या जीवनाचा प्रारंभ करायचा होता.

'शाळेत हजर होण्यापूर्वीच या साऱ्यांचा विचार मनाशी करून ठेवला होता मी. आणि त्याच सावधगिरीनं मी वर्गात प्रवेश केला होता. विषयाची तयारी केली नसली तरी माझी एक आवडती कविता त्या दिवशी मी सुरू करणार होतो. त्यावर एक तास घ्यायची माझी तयारी होती.

वर्गात एक नजर फिरवून मी पुस्तक उघडलं. माझा पहिला शब्द ऐकायला मुलं उत्सुक होती प्रस्तावनेदाखल मी विचारलं,

"कविवर्य विनायकांच्या कविता कुणी वाचल्या आहेत ?"

त्याच मुलीनं हात वर केला.

"तू वाचल्या आहेस ?" मी विचारलं,

"एक माहीत आहे." ती म्हणाली. साऱ्या वर्गाचे डोळे तिच्याकडे वळले.

"कोणती ?"

तिनं एक नाव सांगितलं.

मला बरं वाटलं. वर्गाची तयारी बरीच आहे हे मला समजून चुकलं. मला हुरूप आला. थोड्याशा प्रस्तावनेनंतर मी सांगितलं,

"आपण आणखी एक कविता वाचू : स्त्री आणि पुरुष." आणि मी संथ व भावपूर्ण स्वरांत कविता वाचू लागलो. कवितेचा एक भाग वाचून झाला. मी एक-वार मुलांवरून नजर फिरविली. मुलांच्या नजरा पुस्तकात होत्या. कवितेचा परिणाम मुलांची पकड घेऊ लागल्याचे स्पष्ट दिसत होते. आणि निम्मे यश काबीज केल्याचं समाधान मला वाटत होतं.

मधल्या बाकावरच्या त्या मुलीनं चुळबूळ सुरू केली.

"तुझं लक्ष नाही. पुस्तकात लक्ष हवं. नाव काय तुझं ?"

"किशोरी." तिनं उत्तर दिलं.

पहिल्यापासून आपला वचक ठेवावा या विचारानं पुन्हा मी तिला सांगितलं, 'लक्ष दे पुस्तकाकडे."

पुन्हा मी वाचू लागलो. एका क्षणापुरत्या उंचावलेल्या माना पुन्हा पुस्तकात वळल्या. कविता संपत आली होती. मी शेवटची ओळ वाचली,

'टिपे तिची टप्टप् गळली...
का ती ते; काय कथू मी रसिकाते...'

कविता वाचून संपविली आणि एक मध्यवर्ती प्रश्न फेकला—

"पुरुषानं बागेतलं फूल चुरगाळून फेकून दिल्यावर त्या बागेत विहार करणाऱ्या स्त्रीच्या डोळ्यांतून टिपे का गळली ?"

किशोरीनंच हात वर केला होता. आणखीही एक-दोन हात उंचावले होते. मी प्रथम इतर मुलांना उत्तर देण्यास सांगितलं. एक विद्यार्थी म्हणाला,

"ती भित्री होती."

मी दुसऱ्या मुलाकडे बोट केलं. तो म्हणाला,

" ती रडवीच होती. "

त्याबरोबर वर्गात हशा पिकला. कवितेमुळं निर्माण झालेलं वातावरण क्षणात बिनसलं. मी निराश झालो. मला अपेक्षित असलेलं उत्तर मिळालं नाही, असं पाहून त्या मुलीकडे बोट करून विचारलं,

" तू सांगशील ? "

" पुरुष निर्दयपणानं त्या फुलाचा चोळामोळा करतात. " ती म्हणाली. पुन्हा साऱ्यांच्या माना तिच्याकडे वळल्या. मी पुन्हा विचारलं,

" पण त्या क्षुल्लक फुलाबद्दल एवढं वाईट का वाटावं ? "

" तिला कदाचित स्वतःच्या जीवनात असा अनुभव आला असावा. "

त्या मुलीचं हे प्रौढ उत्तर ऐकून मला त्या मुलीबद्दल विशेष कौतुक वाटलं. म्हणून मी त्याच मुलीला पुन्हा विचारलं, " त्या स्त्रीबद्दल तू अशीच का कल्पना केलीस ? "

ती उत्तर देऊ शकली नाही, पण तिला काहीतरी बोलायचं होतं हे मी जाणलं. मी लगेच माझ्या कवितेकडे वळलो. चर्चा बरीच रंगली. पुरुषांच्या निर्दय वृत्तीचं वर्णन मी करीत होतो. समाजातील उदाहरणे देत होतो. प्राचीन उदाहरणे देत होतो. सारा वर्ग तटस्थ होता. तास केव्हाच संपला होता.

बाहेर दुसऱ्या विषयाचे शिक्षक उभे होते. तास संपल्याचं ध्यानात आल्यावर मी थांबलो. त्या किशोरीबद्दलचं कुतूहल अजून माझ्या मनात होतं. तिला काही-तरी विशेष सांगायचं होतं हे मी ओळखलं होतं. त्यामुळं वर्गातून बाहेर पडताना मी एवढंच तिला म्हणालो, " संध्याकाळी शाळा सुटल्यावर मला भेट. "

मी झटकन बाहेर पडलो खरा; पण एका मुलीनं खवचटपणानं काढलेले उद्गार ऐकले—

" भेट बाई तू ! मर्जी दिसत्येय. "


मी सर्दच झालो.

संध्याकाळी किशोरी मला भेटणार हे ठरलेलं. पण वर्गातून बाहेर पडताना मी जे निसटतं ऐकलं होतं, त्याचा अर्थ माझ्या ध्यानात आला होता. तिच्या डोळ्यां-तील बोलके करुण भाव आणि तिनं दिलेलं उत्तर यामुळं माझ्या मनात जी एक प्रकारची जिज्ञासा निर्माण झाली होती. त्या जिज्ञासेमुळेच मी तिला भेटून जा, असे बोलून गेलो. पण मागाहून माझी चूक मला समजली.

त्यामुळं आता पुन्हा असली चूक न करण्याचं ठरवून मी संध्याकाळी तिची वाट न पाहताच घरी निघून गेलो.

दुसऱ्या दिवशी शाळत येताना किशोरीनं मला सांगितलं होतं,

" सर, काल मी ऑफिसमध्ये येऊन गेले होते. "



"हं. पण मला घरी एक काम होतं. नंतर त्याची मला आठवण झाली आणि मी निघून गेलो." मी म्हणालो.

"काल मला का बोलावलं होतं सर ?"

एकदा वाटलं, संध्याकाळी तिला पुन्हा बोलावून कालचा प्रश्न विचारावा, माझ्या मनातील कुतूहलला वाट द्यावी. पण लगेच दुसऱ्या एका खवचट मुलीचं वाक्य मला आठवलं. मी लगेच तिला म्हणालो,

"आज नको. पुढं सांगेन केव्हातरी. आता मी घाईत आहे जरा !"

आणि हे मी बोलायला व दुसरी एक मुलगी जवळून जायला एक गाठ पडली. तिनं आम्हा दोघांकडे अशा नजरेनं पाहिलं, की पुन्हा एकदा माझ्या चुकीची मला जाणीव झाली.

इथल्या मुली काही वेगळयाच प्रकारच्या आहेत असा कयास बांधून मी शाळच्या गेटमधून आत गेलो.

किशोरीला मी दोनदा टाळलं म्हणून माझ्या मनाला रुखरुख लागून राहिली होती. प्रथमच आपल्याबद्दल मुलांत गैरसमज पसरू नयेत म्हणून मी फार जपत होतो. पण किशोरी फार मोकळया मनाची होती. आणि काही केल्या तिचे ते करुण डोळे नजरेसमोरून निघत नव्हते.

दोन महिने निघून गेले होते.

एका संध्याकाळी अचानक किशोरी माझ्या बिऱ्हाडी आली.

" सर ! " दार ठोठावून तिनं हाक मारली. मी दार उघडलं. तिला पाहून मला आश्चर्य वाटलं.

" ये–" मी तिला खोलीत बोलावली. विचारलं, " काही काम आहे का ? शंका वगैरे ? "

" नाही सर..." ती गोंधळली.

" मग या वेळी कशाला मुद्दाम आलीस ? "

" थोडं काम होतं तुमच्याकडे. आणि ते शाळेत होणारं नव्हतं म्हणून–"

" काही पैसे वगैरे हवेत का ? " मी विचारलं.

" तसं नाही. "

" मग ? "

" शाळेत मला बोलता आलं नसतं म्हणून मी इथं आले. "

" विशेष महत्त्वाचं आहे का ? नाहीतर या वेळी माझ्याकडे आलेली पाहून..."

" होय सर. कल्पना आहे मला."

" असं असूनही तू आलीस ? "

तिच्या डोळ्यांत ओले भाव तरळले.

" सर, माझ्यामुळं तुमच्यावर अन्याय होतोय असं मला वाटतं. " ती म्हणाली

" कसा काय ? " मी विचारलं.

तुमचा आणि माझा संबंध जोडून साऱ्या शाळेत चर्चा केली जाते. "

" असं ? " विस्मयानं मी विचारलं.

" तुम्हांला कल्पना नाही सर त्याची...आणि सर, मला शाळेत राहणंदेखील त्रासाचं वाटतंय..."

" पण एवढं झालं तरी काय ? "

" आमच्या वर्गातली सुलोचना मला सतावते सर. तिनंच हे उठवलंय. "

" साध्या एका मुलीचं बोलणं मनावर घेतेस तू ? "

" सर, तुम्हांला माहीत नसेल. ती शाळेच्या सेक्रेटरींची मुलगी आहे. "

" असेना का– " मी म्हणालो.

" मनात आणील तसं ती करू शकते."

" पण ती तुझ्या मागं तरी का लागते ? "

" त्याचं कारण वेगळं आहे सर. पण तिनंच हे सारं उठवलं आहे. सर, तुमच्या नावाला असा काळीमा लागू नये असं मला मनापासून वाटतं ? "

" तुला असं खरोखर वाटतं ? "

" होय सर. "

" मग तू काय करणार आहेस ? "

" मी शाळा सोडणार आहे. "

" क्षुल्लक कारणासाठी शाळा सोडणार तू ? शेवटचं वर्ष तुझं– "

" हे क्षुल्लक नाही आहे सर ! मला वर्गात बसणंदेखील कठिण वाटतं. "

" शाळा सोडायचा मूर्खपणा करू नकोस, किशोरी. काय करायचं ते मी पाहतो. तू जा आता. " मी तिला परत पाठविली.

भोळी पोर !

ती गेल्यावर माझं मन अस्वस्थ झालं. शिक्षकी पेशातला हा माझा नवाच अनुभव होता. मी आलो होतो एक ध्येय उराशी बाळगून...एक नामवंत शिक्षक व्हायचं मी ठरविलं होतं. पण हे काय घडत आहे तेच मला समजेना.

किशोरी निष्पाप आहे. तिच्यावर असा अन्याय होता नये असं मला मनापासून वाटत होतं. आणि ती माझ्या अब्रूला जपत होती.

तेव्हापासून त्या पोरीनं माझ्या मनाचा एक वेगळाच कोपरा पटकावला होता. केवळ सहानुभूतीच्या पलीकडे ही एक वेगळी भावना माझ्या मनात निर्माण झाली होती.

दुसऱ्या दिवशी अचानक हेडसरांकडून मला एक चिठ्ठी आली म्हणून मी त्यांना भेटायला गेलो. त्यांनी माझ्या हातांत एक पत्र देत म्हटलं, " हे वाचा–"

पत्र माझ्या नावाचं होतं. त्यांच्या हाती ते कसं गेलं असावं, याचा विचार करीत मी ते पत्र त्यांच्याकडून घेतलं. पत्राखाली सही किशोरीची होती. पत्र किशोरीचं होतं. परंतु पत्रातील मजकूर इतका अश्लील आणि अर्वाच्य असा होता; की किशोरी असं कधी करणार नाही याची मला खात्री होती. हेडसर माझ्या चेहऱ्यावरची हालचाल पाहत होते.

" हे पत्र बनावट आहे. " मी म्हटलं.

" कशावरून ? "

" हे अक्षर किशोरीचं नव्हे; कुणीतरी हा चावटपणा केला आहे. "

" असू शकेल. पण असा चावटपणा करण्यासारखं काही हातून घडलं आहे का? " त्यांनी विचारलं.

" मला वाटत नाही " सुरांतील निश्चय कायम ठेवून मी म्हणालो.

" आपल्याला कळत नाही, मोघे ! पण मुलांच्या दृष्टीतून बारीकसारीक गोष्टी सुटत नसतात. अजून तुम्हांला बराच अनुभव घ्यायचा आहे. सावध राहा. "

असे म्हणून त्यांनी मला जाण्यास सांगितले. मी ते पत्र पाहून गोंधळूनच गेलो होतो. स्टाफरूममध्ये जाऊन वह्यांचा ढीग काढला. त्यातील हस्ताक्षर ताडून पाहिलं. सुलोचनेचं हस्ताक्षर होतं ते. माझ्या डोळ्यांसमोर एका क्षणात सर्व घटना तरळल्या. किशोरीनं सांगितलेलं आठवलं.

मला सर्व कळत होतं. पण हेडसरांच्या मनातील माझ्याविषयीचा गैरसमज कसा काढून टाकायचा, हा महाबिकट प्रश्न मला सतावू लागला होता.

या प्रश्नाचा छडा लावयालाच हवा होता. सायंकाळी शाळा सुटल्यावर मी सुलोचनेलाच बोलावणं पाठवलं. सुलोचना आल्यावर मी तिला एकदम प्रश्न विचारला, " हे पत्र तू का लिहिलंस ? "

तिच्यावर हा अचानक हल्ला झाला होता. ती बावरली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव ओळखून मीही ' समजायचं ' ते समजलो.

मी संतापलो.

" तू सेक्रेटरीची बहीण असलीस तरी असल्या गोष्टी मला सहन व्हायच्या नाहीत. तुझं नाव काढायला लावीन. " मी रागाने बोललो. ती रडू लागली.

" चूक झाली माझी. " रडतच ती म्हणाली.

" या पत्राचा काय परिणाम झाला माहीत आहे ? हेडसरांच्या हातांत हे पत्र पडलं होतं. तुझ्यामुळं मला बदनाम व्हावं लागत आहे. का केलंस तू हे ? "

" माझ्या भावानं हे लिहायला लावलं. " ती म्हणाली.

" खरं सांगतेस ?"

" होय. "

" कुणी ? सेक्रेटरी साहेबांनी ? "

" नाही. "

" मग ? "

" त्यांच्याहून लहान. "

" काय करतो तो ? "

" बाजारात दुकान आहे. "

" मग तिनं जे सांगितलं ते ऐकून मी सर्दच झालो.

तिच्या भावाकडे किशोरीचे वडील नोकर म्हणून काम करीत होते. सुलोचने-कडून एवढी माहिती पुरे होती. त्या भावाला मी अनेकदा बाजारात पाहिलं होतं. त्याच्याविषयी माझ्या मनात प्रतिकूल भावना झाली होती. त्यामुळं तो हे करायला का उद्युक्त झाला असावा, याची मला मला थोडी कल्पना आली.

सुलोचनेचा यात काही दोष नव्हता. सारं कारस्थान त्या भावाचं होतं. केवळ स्वार्थी बुद्धीनं आणि घाणेरड्या इच्छेनं त्यानं ते केलं होतं.

मी सुलोचनेला जाण्यास सांगितलं.

दुसऱ्या दिवशी किशोरीच माझ्या घरी आली. तिच्या चेहऱ्यावर दुःख साकळ-लेलं दिसतं होतं. शाळेतही ती मला मलूलच दिसली होती. माझ्याकडे ती या वेळी का यावी ते मात्र मला समजेना. कदाचित सुलोचनेच्या बनावट पत्राबद्दल तिला काहीतरी समजलं असावं असं मला वाटलं. त्याबद्दल तिला काही सांगायचं असावं...

मी तिच्याकडे पाहिलं मात्र. तिच्या डोळ्यातून दोन टिपं खळाळली.

" सर–" कसंबसं ती म्हणाली.

" काय सांगतेस ?"

" उद्यापासून मी शाळेत नाही येणार. "

" का ? "

" मला सहन नाही होत हे. "

" काय ? "

" काल तुमच्या आणि हेडमास्तरांच्यांत झालेलं संभाषण मला ऐकू आलं. "

" मग त्यात तुझा संबंध काय ?"

" माझ्यामुळं तुम्हांला दूषण मिळत आहे सर. " थोडावेळ थांबून ती म्हणाली, " मीच शाळेत येत नाही. "

" अग, पण असा अविचार करून कसं भागेल ? " मी विचारलं.

त्यावर ती लगेच उत्तरली, " मोलमजुरी करणारी आमची जात. कशाला हवं सर आम्हांला शिक्षण ! तुमच्यासारख्यांना मात्र आमच्यामुळं कोणताच कलंक लागू नये सर. " तिचे डोळे डबडबले. थोडा वेळ थांबून ती म्हणाली, " मी जाते सर. ओळख ठेवा गरिबाची ! "

असं म्हणून तिनं माझ्या पायांना स्पर्श करून हात जोडले, आणि झटकन मागं वळली. मला एकदम गहिवरून आलं. या वयात एवढा समंजसपणा हिला कोणी शिकविला ? केवळ माझ्यासाठी एक मुलीच्या आयुष्याची प्रगती खुंटावी, एवढा मी कोण मोठा लागून गेलोय ? एवढा कोणता अधिकार मला ?

एक कोवळी पोर माझ्यासाठी एवढा त्याग करते आहे. मग मला नको का तिच्यासाठी काही खटपट करायला ? माझ्याविषयीच्या असलेल्या तिच्या भक्तीचं हेच का तिला फळ मिळावं ?

मी ठरविलं, या साऱ्यांचा छडा लावलाच पाहिजे. त्यासाठी कोणतंही मोल द्यावं लागलं तरी हरकत नाही. मी तिला हाक मारली. ती परत आली. डबडबलेल्या डोळ्यांनी बाजूला तोंड वळवून तिने डोळे पुसले.

" सुलोचनेच्या भावानं तुझ्याकडे द्वेषबुद्धीनं का वागावं ? " मी विचारलं.

" मी काही सांगू शकत नाही सर ? तुम्ही मला हे विचारू नये. "

" माझ्यासाठी तू शाळा सोडणार म्हणतेस. मग मला एवढंदेखील विचारायचा हक्क पोचत नाही का ? किशोरी, मला तू सारं सांगितलं पाहिजेस. "

तिचं अंतःकरण भरून आलं. ती म्हणाली, " माझे वडील त्याच्याकडे नोकर आहेत, सर. पैशासाठी सारं सहन करावं लागतंय. तुम्हांला सांगता येणार नाही सगळं. " ती एकदम थांबली.

" सांग. आता सगळं सांगून टाक. मी कुणाला सांगणार नाही. तुझं दुःख मला समजलंच पाहिजे, किशोरी ! "

" वडिलांना मदत म्हणून त्याच्याकड मीही अधून मधून कामाला जाते. त्याची

नजर वाईट आहे. पण सारं सहन करावं लागतं. एक दिवशी त्यानं विचारलेल्या प्रश्नाला मी नकार दिला तेव्हापासून तो चिडला आहे. "

माझ्या डोक्यात क्षणभर वीज चमकून गेली. साऱ्या गोष्टींचा एकदम उलगडा झाला.

" ठीक आहे ! " मी म्हणालो, " किशोरी, मी तुला वाटेल ती मदत करायला तयार आहे. तू शाळा सोडता नये. समजलं ? "

" नको. सर, माझ्यासाठी तुम्ही काही करू नका. तुमच्याबद्दल लोक नको ते बोलतील ! "

" माझं मी पाहून घेईन. "

" नको सर. जाते मी—"

क्षणात ती निघून गेली. शून्य नजरेनं मी पाहत राहिलो.

रात्रभर बेचैनीत घालविली. वाचनात लक्ष लागेना. राहून राहून किशोरी डोळ्यांसमोर येत होती. एकच किशोरी नव्हे; शाळेतल्या साऱ्या मुली मला किशोरीप्रमाणे वाटू लागल्या. किशोरीच्या वडिलांचा मालक नजरेसमोर आला. असल्या घाणेरड्या प्रवृत्तीनं बरबटलेली असंख्य माणसं मला त्याच्या रूपात दिसू लागली. मन खिन्न झालं. पण मी काय करणार होतो ?

किशोरीसाठी काहीतरी मार्ग काढणं भाग होतं. किशोरीचे वडील शाळेच्या सेक्रेटरीच्या भावाकडे नोकर. साऱ्या गोष्टींमुळं कदाचित त्यांची नोकरी जाईल. पण किशोरीला वाचविलं पाहिजे. तिचं सारं आयुष्य अजून जायचं आहे. आयुष्यातून उठता नये ती.

तिच्या वडिलांना भेटायचं मी ठरवलं. तिचं शिक्षण अपुरं राहता नये. शेवटचं वर्ष आहे. चांगले मार्क मिळवील तर पोरगी नाव काढील. पण ते स्वास्थ्य तिला इथं मिळायचं नाही. दुसऱ्या गावात तिची सोय होते का पाहावं. मुलींच्या होस्टेल-मध्ये ठेवावी...थोडा काळ खर्च सोसावा लागणार आहे...तेवढा खर्च मी करू शकलो असतो.

पुढं नोकरी करून वडिलांना मदत करील ती.

ही कल्पना तिच्यात वडिलांकडे मांडावी असा मी निश्चय केला, तेव्हा कुठं मन शांत झालं.

सकाळी उठल्यावर प्रसन्नता आली. उत्साहानं मी काम करू लागलो. माणूस या नात्यानं एक चांगलं कर्तव्य पार पाडता येणार याचाच मला आनंद होता. शाळा सुटली की तिच्या वडिलांच्या घरीं जाऊन त्यांना भेटणार होतो, किशोरीला समजावून सांगणार होतो.

पण शाळेत गेल्यावर मात्र सारा उत्साह मावळला. शाळेच्या शिपायानं माझ्या हातांत चिठ्ठी दिली. हेडसरनी मला ऑफिसात बोलावलं होतं.

" मोघे सर. "

मी आत जाताच त्यांनी हाक मारली. मी समोरच्या खुर्चीवर बसलो.

" तुमच्याकडून मी अशी अपेक्षा नव्हती केली, मोघे सर ! " चष्म्याच्या वरच्या भिंगातून पाहत ते मला म्हणाले.

" काय ? " मी विचारलं. मला काहीच कल्पना येईना.

" शाळेच्या शिक्षकाचं वर्तन जर बिघडलं, तर मुलांपुढं तसा आदर्श घातुक ठरेल. मोघे सर ! "

" काय झालं माझ्या हातून ? जरा स्पष्ट समजू द्या मला. " मी जरा कडवटपणानंच बोललो.

" किशोरी हळदणकरच्या व तुमच्या नावाचे बोर्ड गावात लागलेत याची कल्पना आहे तुम्हांला ? "





श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण पेठ, पुणे २

" कशी असेल ? "

" मांजरानं डोळे मिटले, तरी जग त्याच्याकडे पाहू शकतं. "

" मग आपलं काय म्हणणं आहे ? किशोरीशी माझा अनैतिक संबंध आहे असं म्हणायचं आहे का ?"

" मी म्हणत नाही. जग म्हणतं. "

" त्याला मी काय करणार ? "

" तुम्हांला इथं राहणं या पुढं त्रासाचं होईल. "

" शाळा सोडायला तयार आहे–" माझा तोल सुटला. मी एकदम बोलून गेलो. मी एकदम बाहेर पडलो. मनावर असह्य वजन ठेवून.

कसंबसं शाळेत काम केलं. तास सरता संपेनात. शाळा सुटल्यावर मी एकदम किशोरीच्याच घरी गेलो. किशोरीचे वडील घरीच होते. वय जास्त नव्हतं. सुमारे चाळीशीच्या बाहेर गेलेलं. किशोरीच्या मानानं फार वयस्क वाटले ते मला. मी गेल्यावर त्यांनी माझं स्वागत केलं; पण त्यात आपुलकी, आदर वाटला नाही मला. या माणसाला समजावून सांगणं कठीणच वाटलं मला. तरी मी प्रयत्न केला.

" तुम्ही किशोरीचे वडील ना ? "

" होय. "

" किशोरीसंबंधानं बोलायला मी आलोय. "

" मास्तर, तुमच्यासारख्यांना मीं सांगू नये; पण तुम्ही या फंदात पडू नये. "

" म्हणजे ? कोणत्या फंदात ? " मी आश्चर्यानं विचारलं.

" तुमच्यामुळं माझ्या पोरीची अब्रू गेली आहे मास्तर ! कालपासून पोरगी काही खात नाही, बोलत नाही. आणि काही सांगत नाही. तुम्हांला गावात राहायचं असेल, तर मुकाट्यानं राहा. दुसऱ्याच्या पोरींना नादाला लावू नका. समजलं ! तुम्ही मास्तर. मी अडाणी. माझ्याकडून तुमचा अपमान होऊ नये."

माझ्या पायाखालचा आधार नष्ट होत चालला आहे, असं मला वाटू लागलं काय बोलावं ते मला सुचेना. माझे सारे बेत ढासळून गेले होते किशोरीच्या वडिलांचाही माझ्याविषयी गैरसमज झाला होता, तो दूर कसा करणार ?

मी उठलो आणि एवढंच म्हटलं,

" किशोरीला म्हणावं तू शाळेत जाऊ लाग. आता तुझ्याविषयी गावात कुणी बोलणार नाही. कारण मीच शाळा सोडून चाललोय......"

मी जाण्यासाठी वळलो, तेवढ्यात किशोरी बाहेर आली. काही बोलली नाही. तिला बोलायचं होतं, ते तिचं सारं अंग बोलत होतं. ती फक्त उभी होती. डोळ्यांतलं आभाळ ओथंबून आलं होतं......कोणत्याही क्षणी कोसळणार......मला ते पाहवेना. चटकन मी नजर फिरविली आणि निघालो. कुणीतरी फरफटत ओढून नेल्याप्रमाणं ! ●

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस 'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.

# भारत सरकार या डोंगरी नेत्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देते आहे काय ?

सुमारे ६३ मैलांचा जंगलांचा आणि नागमोडी वळणाचा डोंगरी रस्ता कापून बस शिलाँगच्या थंड हवेत शिरली, तेव्हा अंगणात शिपडल्याप्रमाणे पावसाचा नुकताच एक शिडकावा येऊन गेला होता. आजूबाजूच्या शिखरांशी ढग अजून दंगामस्ती करीतच होते.

गावात उतरून थोडासा फेरफटका मारला आणि एकदम ध्यानात आले की हे काही वेगळेच आहे. पीत वर्णाचे मंगोलियन चेहरेपट्टीचे स्त्री-पुरुष, थंडगार हवा, नागमोडी वळणे घेत चढउतार करणारे रस्ते, ठेंगणीठुसकी, सुबक लाकडी घरे, सरळ उंच वाढणारे हिरवेगार वृक्ष. देशाच्या वेगळ्याच भागात आल्याचे जाणवत होते.

शिलाँग ही आसामची राजधानी आहे. त्याचबरोबर खासी आणि जैनतिया टेकड्यांचे जिल्ह्याचे ठिकाणही आहे. खासी टेकड्यांमध्ये सुमारे पाच हजार फूट उंचीवर शिलाँग वसले आहे. त्यामुळे गावातील बहुसंख्य वस्ती खासी जमातीची आहे. थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटिशांनी शिलाँगला आसामची राजधानी केले. बाकी तशी आसामची सांस्कृतिक आणि व्यापारी राजधानी गोहत्तीच समजली जाते. पण राजधानीचे ठिकाण म्हणून ब्रिटिशांनी शिलाँगचा खूपच विकास केला. आज भारतातील काही सुंदर शहरांमध्ये शिलाँग ओळखले जाते.

शिलाँगला खासी लोकांची बहुसंख्य वस्ती आहे, हे ऐकल्यावर माझा जरा गैरसमज झाला होता, पण खासी लोकांमधील शिक्षितांचे प्रमाण ४५ टक्क्यांवर आहे आणि त्यांच्यातील ख्रिश्चन धर्मीयांचे प्रमाणदेखील खूप आहे हे मी विसरलो होतो. विशेषत:, शिलाँगसारख्या ठिकाणी तर हे प्रमाण खूपच आहे. त्यामुळे शिलाँग-मध्ये जरा अनपेक्षित धक्का बसला.

पूर्वांचल

## आसाम

## ६

खुद्द शिलाँगमध्ये खासी वस्त्राभूषणे घातलेला एकही खासी माणूस मी पाहिला नाही. गोहत्ती-शिलाँग रस्त्यावर तशी माणसे थोडी दिसली. मात्र शिलाँगमध्ये अगदी आधुनिक पद्धतीच्या अमेरिकन काऊबॉयसारख्या तंग विजारी, कॉलर्स वर केलेले उघडे जॅकेट्स्, निमुळते बूट यांचेच तरुणांमध्ये अधिक प्रस्थ दिसले. शिलाँगमध्ये या सुरनळयांसारख्या तंग विजारी जेवढ्या प्रमाणात दिसतात तशा त्या पुण्या-मुंबईतही दिसत नाहीत. जरा प्रौढ पुरुषांचा वेष म्हणजे पूर्ण अमेरिकन सूट. तिथले मजूरही फाटक्या तुटक्या आणि मळक्या का होईना पण तंग विजारीच घालतात. खासी स्त्रियांनी मात्र आपला वेष बऱ्याच प्रमाणात राखला असावा. शिलाँगमधील बहुसंख्य खासी स्त्रिया स्कर्ट घालीत असल्या तरी तो नेसण्याच्या पद्धतीमध्ये आणि अंगाभोवती शाल गुंडाळण्याच्या त्यांच्या पद्धतीमध्ये त्यांचा खासीपणा दिसून येतो

शिलाँगमधील ख्रिश्चन वस्त्यांमधून फेरफटका मारणे हा तर एक विलक्षण अनुभव आहे. अमेरिकन कपडे घातलेली छोटी छोटी मुले रस्त्यावर खेळत असतात. तंग विजारी आणि उघडया कॉलरचे जॅकेट्स् घातलेले 'टीन एजर्स' ऐटीत सिगरेट्स फुंकीत खिशात हात घालून उभे असतात किंवा रस्त्यावरच जुगार खेळत असतात. त्यांची भांडणंदेखील इंग्रजीतूनच चालतात. मधूनच एखाद्या घरातून पाश्चात्त्य संगीताचे किंवा इंग्रजी गाण्याचे सूर ऐकू येतात. एक त्या लोकांची चेहरेपट्टी सोडली तर आपण एखाद्या अमेरिकन स्लममधून किंवा युरोपियन खेडयांमधून हिंडत असल्यासारखे वाटते.

डोंगरी लोकांच्या समस्येवर तोडगा काय, असा प्रश्न मी ज्या ज्या लोकांना विचारला त्यांनी त्यांनी डोळे मिटून सरळ ठोकून दिले, " डोंगरी लोक आणि मैदानी लोक

यांच्यांत परस्पर प्रेम आणि सामंजस्याची भावना निर्माण केली पाहिजे." (वुई शुड क्रिएट अॅन अॅटमॉस्फिअर ऑफ म्युचुअल लव्ह अॅंड अंडरस्टॅंडिंग बिट्विन द टू पिपल्स)

शिलाँगमध्ये मात्र मला या 'म्युच्युअल लव्ह' चा कुठे मागमूसही दिसला नाही. उलट डोंगरी लोकांत आणि मैदानी लोकांत एकमेकांबद्दल विलक्षण संशय आणि तिरस्कार वसत असलेला दिसला. मैदानी लोक डोंगरी लोकांबद्दल अत्यंत तिरस्काराने बोलतात. शिलाँगमध्ये भेटलेल्या पहिल्या पत्रकाराने मला सल्ला दिला, "फॉर गॉड्स् सेक् डोन्ट प्ले अप दीज हिल्स पीपल. दे आरं रास्कल्स्." (काहीही कर पण या डोंगरी लोकांना जादा महत्त्व देऊ नकोस. ते बदमाष आहेत.) परस्परांबद्दल भीतीही फार आहे. मैदानी लोक खासी ख्रिश्चनांच्या वस्तीत सहसा जात नाहीत आणि रात्री अंधार पडल्यावर बाहेर पडत नाहीत. दगाफटका होण्याची त्यांना भीती वाटते. सूर्य मावळल्यावर बाहेर पडू नको, असा सल्ला मलाही अनेकांनी दिला.

## टीन एजर्स

खासी ख्रिश्चन वस्तीमधून हिंडण्याचा माझा अनुभव तर मजेशीर आहे. हा कोण बाहेरचा मैदानी चेहऱ्याचा परका माणूस आपल्या वस्तीत आला म्हणून सारे लोक कुतूहलापेक्षा संशयानेच माझ्याकडे वळून पाहत होते. रस्ता चुकला म्हणून १५-१६ वर्षांची दोन खासी मुले जात होती, त्यांना विचारलं. ती माझ्याच दिशेनं जात होती म्हणून त्यांच्याबरोबर निघालो.

दोघांनीही अगदी टीपिकल अमेरिकन 'टीन एजर्स'सारखा पोषाख केला होता. चेहऱ्यावरून दोघेही पक्के बिलंदर दिसत होते. दोघेही कुठच्यातरी ख्रिश्चन शाळेत शेवटच्या वर्गात शिकत होते. त्यांच्यापैकी एकजण मोठ्या रुबाबात सिगारेट फुंकत होता आणि एक संपल्यावर ऐटीत दुसरी पेटवत होता. दोघेही इंग्रजीत बोलत होते. अमेरिकन उच्चारांचाच त्यांच्यावर अधिक प्रभाव दिसत होता. सिगारेट फुंकणाऱ्याने मला ऐटीत विचारलं, "तुम्ही रस्ता चुकला तरी कसा ? आतापर्यंत कुणालाच विचारलं नाहीत ! तुम्हांला काय वाटलं आपोआप रस्ता सापडेल ?"

मी मुंबईकडून आलो आहे असं समजताच डोळे मिचकावून उद्गारला, "वॉव...! बॉंबे ! सो यू हॅव काम हिअर फॉर प्लेझर-हा:" (म्हणजे तुम्ही इथली मजा लुटायला आला तर) तो अशा काही खवचटपणे बोलत होता की, मला खरं म्हणजे राग आला होता. पण अशी मजा लुटायला येणाऱ्या लोकांच्या न ऐकविणाऱ्या गप्पा मी बसमध्ये ऐकल्या होत्या, त्यामुळे राग गिळला. मी पत्रकार आहे, असं समजल्यावर तो म्हणाला, "ओफ्-यू मीन एदीतर...म्हणजे आम्ही लोक कसे वाईट आहोत, भांडखोर आहोत हेच लिहायला आलात ना तुम्ही ?"

त्याच्याशी कसे बोलावे हे कळेना. महाराष्ट्राविषयी, मुंबईविषयी त्याला जुजबी माहिती दिसत होती. मैदानी लोकांविरुद्ध झालेल्या प्रचाराचा त्याच्यावर पूर्ण परिणाम झालेला दिसत होता. शेवटी कशीबशी त्याच्यापासून सुटका करून घेतली.

## दूरत्व

हा संशय आणि तुसडेपणा सर्वत्र दिसतो. एक खासी माणूस आणि एक मैदानी माणूस परस्परांशी प्रेमाने बातचीत करीत रस्त्याने जाताहेत हे दृश्य अगदी विरळा. कामापुरती बातचीत आणि कामापुरते संबंध. मैदानी लोक आणि डोंगरी लोक यांच्यांतील संबंध सुधारावेत म्हणून कुठली एखादी संस्था प्रयत्न करीत असल्याचेही ऐकिवात नाही. पुढारी सांगतात तसे 'म्युचुअल लव्ह' निर्माण होईल, तेव्हा होवो; पण सध्या तरी आसाममध्ये या दोन लोकांमध्ये जबरदस्त म्युचुअल डिस्ट्रस्ट–परस्पर अविश्वास–आणि भीती आहे हे निश्चित !

हे जे दूरत्व, हा जो अविश्वास निर्माण झाला आहे आणि नागालँड, मिझो टेकड्या यांमध्ये फुटीरपणाची भावना निर्माण झाली आहे व डोंगरी लोकांसाठी वेगळ्या राज्याची मागणी आली आहे; त्यामागचे मुख्य कारण ब्रिटिशांचे धोरण असे जनसंघ व कॉंग्रेसमधील एक गट हे लोक सांगतात तर ब्रिटिशांचा काही दोष नाही, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारने या लोकांना जवळ करण्यासाठी काही प्रयत्न केले नाहीत, म्हणून हा प्रसंग आला, असे विरोधी पक्षांतील लोक सांगतात. प्रजासमाजवादी पक्षाचे आणि डाव्या कम्युनिस्टांचे पुढारी वांशिक आणि भाषिक भेदांचा हा परिणाम आहे असे सांगतात, तर मैदानी लोकांच्या आर्थिक आणि राजकीय वर्चस्वामुळे असे घडते, अशी बऱ्याच जणांची तक्रार आहे.

"डोंगरी लोकांचे शिक्षणाचे प्रमाण आमच्यापेक्षा खूपच जास्त आहे. आम्ही त्यांच्यावर राजकीय वर्चस्व गाजवूच शकत नाही–" मैदानी लोकांचे समर्थन करताना आसाम कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. शरत्‌चंद्र सिन्हा सांगत होते. श्री. सिन्हा हे स्वत: 'कोच' या मैदानी वन्य जमातींपैकी आहेत.

ब्रिटिशांनी निर्माण केलेले दूरत्व आणि परकीय मिशनऱ्यांचा प्रचार यांच्यावर या डोंगरी जमातींमधील फुटीरपणाची जबाबदारी आहे असे त्यांना वाटते. मैदानी लोकांनी या डोंगरी भागावर आर्थिक वर्चस्व कधीच गाजविले नाही. उलट डोंगरी भागांचे उत्पन्न एवढे कमी आहे की, आसामच्या मैदानी भागाच्या उत्पन्नावरच सारे डोंगरी जिल्हे पोसले जातात, असे त्यांचे म्हणणे आहे.

आसामच्या पुनर्रचनेविषयी चालू असलेल्या चर्चेबाबत मी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले, "केंद्र सरकारने फक्त 'फेडरल प्लॅन' म्हणून संदिग्ध घोषणा केलेली आहे. योजनेचा तपशील अद्याप ठरायचा आहे; तोपर्यंत आम्ही काहीच बोलू शकत नाही."


## साखळी-प्रक्रिया

वेगळ्या डोंगरी राज्याला आसामच्या मैदानी लोकांचा का विरोधी आहे हे सांगताना श्री. सिन्हा म्हणाले, " या लोकांच्या राजकीय आकांक्षा दडपून टाकायचा आमचा उद्देश मुळीच नाही; किंवा त्यांच्यावर राजकीय वर्चस्व गाजवायचीही आमची इच्छा नाही. आसामची आणि भारताची सुरक्षा ही आमची प्रमुख चिंता आहे. अशी छोटी छोटी राज्ये भारताच्या सीमेवर निर्माण करणे कितपत हितकारक आहे ? नागांना राज्य दिले त्यामुळे मिझोंना वाटू लागले, आपणांलाही वेगळे राज्य हवे. त्यांच्यांतील फुटीरपणाची वृत्ती वाढली. त्यांच्यामुळे साऱ्या डोंगरी लोकांनाच वाटू लागले, आपले वेगळे राज्य हवे. ही साखळीची प्रक्रिया केव्हा तरी थांबवायलाच हवी, नाही तर ती भाषाही पुढे वाढत जायची."

शिवाय एकच डोंगरी राज्य देऊन या डोंगरी लोकांचे समाधान होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, " ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सला गारो, खासी, जैनतिया, मिकीर, काचार व मिझो टेकड्या मिळून सर्वांचे एकच संपूर्ण डोंगरी राज्य हवे आहे. परंतु त्यामुळे या सर्वांचे समाधान होणार नाही, याची आम्हांला खात्री आहे. कारण गारो लोकांमधील बऱ्याच गारोंचा खासींसारख्या पुढारलेल्या जमातींबरोबर राहण्यास विरोध आहे. खासी लोक आपल्यावर कुरघोडी करतील याची त्यांना भीती वाटते. तीच परिस्थिती मिकीर आणि काचार टेकड्यांची. त्यांना स्वतःला खासींबरोबर जाण्यापेक्षा आसामबरोबर राहणे आवडेल आणि मिझोमधील तर एक गट बंडखोरपणे स्वतंत्र सार्वभौमत्व मागतो आहे तर दुसरा गट वेगळे राज्य मागतो आहे. तेव्हा ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरस काही या सर्वांचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. "

फेडरेशनच्या योजनेला आसामातील बऱ्याच लोकांचा विरोध आहे याचे कारण मला असे आढळून आले आहे की, फेडरेशनच्या योजनेमुळे आसामी लोकांची अस्मिता दुखावते. फेडरेशन झाले की आसामचा मैदानी भाग हाही इतर भागांच्या बरोबरीचाच घटक राहील आणि त्याचे महत्त्व संपुष्टात येईल ही त्यांना भीती वाटते. बरेच जणही बोलूनही दाखवतात काही काही जण तर असेही म्हणतात की, डोंगरी लोकांना वेगळे राज्य दिलेले परवडले, पण राज्याची फेडरल धर्तीवर रचना व्हायला नको.

एका डोंगरी राज्याच्या मागणीला विरोध करणारे जे डोंगरी गट आहेत म्हणून श्री. सिन्हा यांनी सांगितले, ते गट म्हणजे त्या त्या जिल्ह्यांतील कॉंग्रेस कमिट्या; पण केवळ उत्तर काचार, मिकीर पहाडी जिल्हा सोडला तर बाकी सर्व पहाडी जिल्ह्यांमध्ये ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सने या कॉंग्रेस कमिट्यांचा जोरदार पराभव केला आहे. कडक मतांचे एक राजकीय पुढारी गोहत्तीत मला भेटले. ते म्हणजे श्री. विश्व गोस्वामी, आसाम प्रजासमाजवादी पक्षाचे सेक्रेटरी. श्री. गो-




स्वामी म्हणाले, " भारत सरकार या डोंगरी नेत्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देते आहे. या डोंगरी नेत्यांमागेच सर्व पहाडी जनता आहे हे कशावरून ? उलट जनतेतील बरीच मोठी संख्या या नेत्यांना विरोध करते आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या नेत्यांनी १२ पैकी ९ जागा मिळविल्या खऱ्या. पण त्यांच्या विरोधकांनी किती मते मिळवलीत हे ध्यानात घ्यायला हवे. मी तर म्हणतो, ज्या भागात जनमताचा कौलच घ्यावा. आपोआप ही मागणी थंड पडेल–"

" अहो, पण जनमताच्या कौलाचा गोव्यात काय निकाल लागला ध्यानात आहे ना ? लोकांच्यावर निर्णय सोपवला तर ते नेहमी फुटून निघण्याच्या प्रवृत्तीचे असतात–"

" पण इथे तसं नाही. पहाडी लोकांमधील एक फार मोठा गट आम्हांला वेगळे राज्य नको. जनता कौल घ्या म्हणजे तुम्हांला जनतेचे खरे मत कळेल असे सारखे सांगतो आहे."

## मागणी नेत्यांची आहे

श्री. गोस्वामी पुढे म्हणाले, " ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्स मुळी लोकांचे प्रतिनिधित्व करीतच नाही. तसे असते तर त्यांनी ' लीडर्स 'च्या ऐवजी ' पीपल्स ' हा शब्द वापरला असता. ही नेत्यांची परिषद आहे आणि मागणीही नेत्यांचीच आहे. पहाडी लोकांची मैदानी लोकांकडून आर्थिक पिळवणूक होत नाही., त्यांच्यावर

राजकीय वर्चस्वही गाजविले जात नाही. या साऱ्या भावना त्यांचे नेते त्यांच्या मनात भरवून देतात. त्यांची खरी पिळवणूक करतात हे त्यांचे नेते आणि त्यांच्यावर सर्व तऱ्हेचे वर्चस्व गाजवतात ते हेच नेते ! या नेत्यांनी पहाडी लोकांचे मोठे नुकसान केले आहे. प्रथम त्यांना दूर केले पाहिजे. म्हणजे सर्व सुरळीत होऊ शकेल. हे नेते आपल्या लोकांच्या भावना चेतवतात ते आपल्या वांशिक आणि भाषिक वेगळेपणावर–"

आपण भारतापासून, इतर भारतीयांहून वेगळे आहोत, अशी भावना खरोखरच या लोकांमध्ये फार तीव्र आहे, असे सांगून श्री. गोस्वामी म्हणाले, " आणि हे माहीत असूनही गेल्या वीस वर्षांत आमच्या सरकारने काहीच केले नाही. आपण भारतीय आहोत हे त्यांच्या मनांत ठसविण्यासाठी कोणताही प्रचार केला नाही. नागालँडच्या लोकांनी त्यांना धडा घालून दिला आणि मिझो लोकांनी त्यांना धीट बनवले आहे आणि आता त्यांचा धीटपणा बघून अहोमसारख्या आणि इतर मैदानी वन्य जमातीसुद्धा आपले वेगळे राज्य मागू लागल्या आहेत. थांबविल्याशिवाय आपोआप ही प्रक्रिया थांबणार नाही–"

" मग यावर उपाय काय ? "

" सर्व परिस्थितीच वेगळ्या दृष्टिकोनातून हाताळायला हवी होती. या जिल्हा मंडळांनी गरीब जनतेचे फार नुकसान केले. नेत्यांना बंगले मिळाले, जीप्स मिळाल्या; पण सामान्य माणसाला काहीच मिळाले नाही. मैदानी लोक आणि पहाडी लोक यांचे परस्परसंबंध वाढायला हवेत, त्यांच्यांतील भावनिक ऐक्य आणि प्रेम व समंजस्य वाढायला हवे......अर्थातच या समस्येवर तयार तोडगा नाही. पण सरकारने या पहाडी नेत्यांच्या धमक्यांना घाबरता कामा नये. त्या ऐवजी सरकारने जिल्हामंडळांना अधिक अधिकार देऊन ही मंडळी योग्य कारभार करताहेत किंवा नाही यावर बारीक लक्ष द्यायला हवे. धमक्यांना आपण घाबरत नाही असे जर केंद्र सरकारने दाखविले आणि वेगळ्या डोंगरी राज्याच्या मागणीविरुद्ध जर घट्ट भूमिका स्वीकारली तर ही मागणी हळू हळू कमी होईल याची खात्री आहे.'

आसाम जनसंघाला हा सारा प्रश्न मुख्यत: धार्मिक वाटतो. नागा, मिझो, खासी, गारो वगैरे लोक बहुसंख्य ख्रिश्चन आहेत. परके ख्रिश्चन मिशनरी त्यांच्यांत वावरतात म्हणून त्यांच्यांत फुटीर प्रवृत्ती बळावते. एकटे मिकीरमधील पहाडी लोक मनापासून भारतात राहू इच्छितात. कारण बहुसंख्य मिकीर जमाती या वनवासी हिंदू आहेत. ख्रिश्चनांचा त्यांच्यांत प्रभाव नाही असे जनसंघाचे म्हणणे आहे.

आसाम प्रदेश जनसंघाचे संघटन मंत्री श्री. देविदास आपटे म्हणाले, " सरकारला जर या बाबतीत काही करायचे असेल तर अगोदर सरकारने या ख्रिश्चन मिशनऱ्यांना बाहेर हुसकून लावले पाहिजे आणि आपल्या लोकांना त्या भागात मोठ्या प्रमाणावर शाळा-कॉलेजेस काढायला उत्तेजन दिले पाहिजे. त्याशिवाय ही समस्या

सुटणार नाही. आपल्याही लोकांचा मोठा दोष आहे. ते अशा भागात कामे करायलाच तयार होत नाहीत."

१७-१८-१९ मार्चच्या सुमारास गोहत्तीला आसाम शाखेचे विश्वहिंदू संमेलन भरले होते. त्यामध्ये जनसंघाने आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोठा पुढाकार घेतला होता. संमेलनाचा प्रमुख उद्देश हाच होता की ख्रिस्ती धर्मान्तरामुळे बळावणाऱ्या फुटीर प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी हिंदू धर्माची चळवळ पहाडी प्रदेशांमध्ये नेणे. संमेलनाला मिझो सोडून बाकी सर्व पहाडी जमातींचे प्रतिनिधी आले होते. हिंदू धर्म सर्व तऱ्हेच्या जमातींना समाविष्ट करून घेऊ शकतो. तुम्हीही हिंदूच आहात, असे या पहाडी प्रतिनिधींना या संमेलनात पटविण्यात आले. एक नवे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हे संमेलन चांगलेच यशस्वी झाले.

पहाडी लोकांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर चिडून भलत्याच थराला गोष्ट नेण्याची त्यांची तयारी आहे. मग नागालँड आणि मिझो या इतिहासाची पुनरावृत्ती करण्यापेक्षा हे लोक भारतात राहतील, अशा तऱ्हेने शक्य तेवढ्या लवकर त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करायला नकोत का ?

एक प्र. स. प. चे श्री. गोस्वामी सोडले या प्रश्नावर जवळजवळ सारेचजण थोडा विचार करून- "अं...हो मग वेगळं राज्य देण्याशिवाय दुसरा इलाज नाही," असे कबूल करतात. मागण्या न्याय्य आहेत किंवा नाहीत या मुद्यावर मात्र सारेच वाद घालतात.

या पहाडी लोकांच्या मागण्या न्याय्य आहेत की नाहीत, त्यांची दुखणी खरीच आहेत का यावर खरे म्हणजे एवढे रण माजायला नको. फेडरेशन योजनेनुसार पहाडी लोकांना आसामच्या फेडरल राज्यात आपल्याबरोबरीचा दर्जा देण्याची आसामी लोकांची तयारी नाही. यावरूनच त्यांची पहाडी लोकांकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे हे दिसते. आणि अगदीच न्यायाचा निकष लावायचा झाला तर पहाडी लोकांचे पारडेच जड जाते. सर्वचजण खाजगीरीत्या हे कबूल करतात. अगदी निकराला प्रश्न आला तर वेगळे पहाडी राज्य देण्याशिवाय गत्यंतर नाही, असे सांगतात. पण फेडरेशनमध्ये बरोबरीचे घटक म्हणून त्यांना सामावून घेण्याची तयारी नाही.

## डाव्या कम्युनिस्टांची भूमिका

आसामातील डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी श्री. अचिंत भट्टाचार्य हे हाच प्रश्न आपल्या खास शैलीतून मांडतात. त्यांची मांडणी आणि खुद्द पहाडी लोकांची मांडणी बरीचशी जुळते म्हणून ती देण्यासारखी आहे.

श्री. भट्टाचार्य म्हणाले, "या पहाडी जमातींना भारताच्या राष्ट्रीय जीवनात

सामावून घ्यायचे असेल तर वेगळ्या पहाडी राज्याची त्यांची मागणी लवकरात लवकर मान्य करणे हाच एकमेव सुरक्षित उपाय आहे."

ते म्हणाले, "भाषिकदृष्टया व सांस्कृतिकदृष्टया वेगळेपण सांगणाऱ्या प्रत्येक प्रदेशाला भारतीय संघराज्यात स्वायत्त राज्य देण्याचे तत्त्व आपण एकदा मान्य केले आहे. हे तत्त्व एकदा मान्य केल्यानंतर केवळ आकार लहान आहे किंवा सीमेवर आहे म्हणून आपण एखाद्या प्रदेशाचा तो हक्क हिरावून घेऊ शकत नाही. तसे करणे म्हणजे आपल्या मान्य तत्त्वाला हरताळ फासण्यासारखे आहे."

सुरक्षेच्या बाबतीत श्री. भट्टाचार्य म्हणाले, "पहाडी जमाती निर्भीड आणि शूर आहेत त्याचप्रमाणे बंडखोरही आहेत. आपण त्यांना आपल्यांत सामावून घेऊन त्यांचे योग्य ते हक्क त्यांना दिले तर आपली सीमा सहज सुरक्षित राहील. या जमातीचा आपल्याला चांगलाच आधार राहील. पण त्यांचे हक्क हिरावून त्यांच्या बंडखोरीला आव्हान दिले तर ते शस्त्रेही हाती घेण्यास कमी करणार नाही–"

या फुटीर प्रवृत्तीचे सारे खापर डावे कम्युनिस्ट कॉंग्रेसी गैरकारभाराच्या माथ्यावर फोडतात. कॉंग्रेस सरकारने मैदानी आणि पहाडी लोक यांच्या बाबतीत फोडा आणि झोडा ही नीती ठेवली. त्याचा हा परिणाम आहे. या पहाडी जमातींचे काय करावे, हेच कॉंग्रेसला कळत नव्हते. त्यामुळे मूर्खासारखा गोंधळ घातला गेला. अगोदरपासूनच पहाडी जमातींच्या आशा-आकांक्षा हेरून त्यांना अधिक स्वायत्तता दिली गेली असती तर आजचा हा प्रसंग येता ना, असे त्यांना वाटते.

डाव्या कम्युनिस्टांचा आसामात मुळीच जोर नाही. पहाडी भागांत तर नाहीच नाही. पण त्यांची आणि पहाडी नेत्यांची मते थोडीशी जुळतात हे खरे आहे. अशी मते मांडण्यामागे त्यांचा हेतू कोणताही असेल. परंतु गंमतीची गोष्ट ही की वेगळ्या पहाडी राज्याला आक्षेप घेणारे सर्व लोक–जनसंघ आणि प्र. स. प. सोडून सर्व मुद्दे मांडून झाल्यावर हताशपणे कबूल करतात, की नागालँड किंवा मिझो टेकड्यांसारखा प्रकार होऊ द्यायचा नसेल तर शेवटी वेगळे राज्य द्यावे लागेलच.

अनेकांना भेटलो होतो. पण खुद्द पहाडी लोकांची बाजू समजून घेतल्याशिवाय काही खरे नव्हते. मी शिलाँगला गेलो तेव्हा आसाम विधानसभेचे अधिवेशन चालू होते. विधानसभेत गेलो त्या दिवशी सारे पहाडी नेते गैरहजर होते. ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सचे जनरल सेक्रेटरी श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय यांच्या निवासस्थानी गेलो. तेथेही ते सापडले नाहीत. शेवटी ते रात्री फोनवर सापडले. ते म्हणाले, "माझी प्रकृती ठीक नाही. आणि सध्या असेंब्ली चालू असल्याने कामेही फार आहेत. पण तरीही बघतो. उद्या सकाळी फोन करा. दुपारी वेळ काढीन."

दुसरे दिवशी सकाळी पहाटेच रॉय यांचा फोन आला, "दुपारी मी बाहेर जात आहे. तासाभरात खासी नॅशनल दरबार हॉलवर या. तिथे आमची सभा आहे. ती संपल्यावर तुम्हांला भेटेन." □

आसाम

६



# अशांतता, असुरक्षितता

# अविश्वास, द्वेष, संशय

**श्री.** स्टॅन्ले निकोल्स रॉय म्हणजे ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सच्या चळवळीमागचे खरे सूत्रधार असे सांगण्यात येते. रॉय हे आडनाव बंगाली आहे. पण तेवढ्यावरून त्यांच्या घराण्याविषयी बोध होत नाही. म्हणून शिलाँगच्या एका पत्रकाराने त्यांच्याविषयी माहिती सांगितली.

त्याच्या सांगण्याप्रमाणे श्री. स्टॅन्ले रॉय यांचे आजोबा हे बंगाली ब्राह्मण होते. त्यांनी एका खासी मुलीशी लग्न लग्न केले. पुढे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. या जोडप्याला झालेल्या मुलाने एका अमेरिकन स्त्रीशी विवाह केला. त्याची संतती म्हणजेच श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय. त्याचे सारे शिक्षण अमेरिकेत झाले आहे. त्यानेही एका अमेरिकन मुलीशीच लग्न केले आहे. त्यांच्यांत जो काय खासी अंश आहे तो त्यांच्या आजीचाच. पण पहाडी लोकांवरील त्यांची पकड जबरदस्त आहे.

खासी नॅशनल दरबार हॉलवर पोचलो, तेव्हा तेथील सभा अद्याप संपायची होती. सभेतून उठून बाहेर आलेल्या एका गृहस्थाने संशयित नजरेने माझी चौकशी

केली. आणि माझे ओळखपत्र घेऊन तो आत गेला. थोड्याच वेळात फिकट गुलाबी रंगाचा पूर्ण अमेरिकन सूट घातलेला उंचापुरा, गोरापान असा एक रुबाबदार गृहस्थ बाहेर आला. वय पंचेचाळीसाच्या सुमाराचे असावे, डोळे निळे होते आणि गळ्याला टायच्या ऐवजी एक जाड मफलर आवळला होता.

हातातील माझे कार्ड बघत तो विजयी सुरांत म्हणाला, " तुम्हीच ना ' माणूस ' प्रतिनिधी ? मी स्टॅन्ले रॉय. आमची सभा अद्याप संपायची आहे. तुम्ही थोडा वेळ बसू शकाल का ?"

त्या कचेरीतील एका खुर्चीवर मला बसायला लावून श्री. रॉय आतल्या सभेच्या हॉलमध्ये निघून गेले. जाताना त्यांनी कचेरीची ती खोली आणि हॉल यांच्यांतील दार काळजीपूर्वक बंद करण्याची खबरदारी घेतली.

ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सची ती शिलाँगमधील कचेरी होती. कचेरीच्या एकंदर परिस्थितीवरून कॉन्फरन्सच्या एकूणच आर्थिक परिस्थितीविषयी विशेष चांगले अनुमान निघत नव्हते. दोन टेबले, दोन जुनाट मोडकळीला आलेल्या लाकडी खुर्च्या आणि बाके. फायलींच्या भाऱ्याचा जुनाट लाकडी रॅक. फोन आणि पुरातन काळचा एक टाइपरायटर एवढंच सामान दिसत होतं. भिंतीवर ' ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सलाच मते द्या ' अशी आवाहने करणारी इंग्रजीतील आणि खासी भाषेतील रोमन लिपीत लिहिलेली पत्रके चिकटलेली दिसत होती. हिरव्या व पांढऱ्या आडव्या पट्ट्यांच्या पार्श्वभूमीवरील गुलाबी फूल ही त्यांची खूण होती. आसामच्या डोंगरी जिल्ह्यांचा एक नकाशाही टांगलेला दिसत होता. पण सारे जुनाट आणि दरिद्री.

एकूण पहाडी लोकच फार दरिद्री आहेत हे माझ्या ध्यानात आले होते. शहरातील लोकांच्या अंगावर उत्तमोत्तम आधुनिक कपडे दिसत असले तरी ती वरवरची भरभराट होती. शिलाँगमध्ये येणाऱ्या प्रवाशांना सुखसोयी पुरवून, उपरे धंदे करून बरेच जण शिलाँगमध्ये उपजीविका करतात. बाकी त्यांच्या वस्त्यांमधून जाऊन पाहिलं, थोडंसं घरांमध्ये डोकावलं की दारिद्र्य एकदम नजरेला येतं.

सभा बराच वेळ चालू होती. ती इंग्रजी भाषेत चालू असावी असे अनुमान अधून मधून कानी पडणाऱ्या एखाद–दुसऱ्या वाक्यावरून काढता येत होते. मधूनच सभेतून उठून ते मधले दार उघडून एखादा गृहस्थ बाहेर यायचा आणि माझ्याकडे संशयित नजरेने बघत निघून जायचा. दार उघडे पडले आहे असे दिसताच आतून कुणीतरी येऊन घट्ट दार लावून जायचा.

## रॉय आणि ' माणूस '

सभा संपल्यावर सारे जण बाहेर पडू लागले. ते सारे खासी–जैनतिया जिल्ह्यातील पहाडी नेते होते. पहाडी नेत्यांविषयी मला अत्यंत कुतूहल होते. पण थोडीशी निराशाच झाली. सारे पँट-कोटात दिसत होते आणि पॉश इंग्रजी बोलत होते.

श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय माझ्यासमोरच्या खुर्चीत अवघडपणे बसले. त्यांचे

बहुधा गुडघे दुखत असावेत. आमच्याभोवती जमलेल्या दोघा-तिघांची त्यांनी ओळख करून दिली. त्यांच्यापैकी एकजण विधानसभेचा सभासद होता.

"कम ऑन नाऊ, शूट," श्री. रॉय म्हणाले, "आपल्याजवळ वेळ फार कमी आहे."

मी म्हणालो, "ठीक आहे. वेगळे राज्य मागण्यामागे नेमकी कारणं काय आहेत, तुमची गाऱ्हाणी काय आहेत हे मला तुमच्या तोंडून ऐकायचं आहे."

**श्री. रॉय :** गाऱ्हाणी सांगण्याची वेळ केव्हाच निघून गेली आहे. आम्ही १९४९ पासून गाऱ्हाण्यांचं रडगाणं वेगवेगळ्या सुरांत लावीत आलो आहोत. आता आम्हांला पुन्हा गाऱ्हाण्यांवर भर द्यायचा नाही. त्यापासून काही निष्पन्न होणार नाही. उलट मैदानी लोकांमध्ये आणि आमच्यांत त्यामुळे पुन्हा वितुष्ट वाढायचं. त्यापेक्षा झालं गेलं ते गंगेला मिळालं, अशी आमची वृत्ती आहे. मैदानी लोकांशी आणि आसामच्या लोकांशी आम्हांला आता मित्रत्वाचे संबंध जोडायचे आहेत. आम्हांला आमच्या प्रदेशाचा विकास साधायचा आहे; आमचे राज्य प्रगतिशील करायचे आहे. आणि गेली पंधरा-वीस वर्षे जे काय झालं त्यापेक्षा आम्ही ही कामगिरी अधिक यशस्वी रीतीने पार पाडू शकू याचा आम्हांला विश्वास आहे.

**मी :** पण तुमचे हे नियोजित डोंगरी राज्य आर्थिकदृष्टया कितपत व्यवहार्य आहे ?

**श्री. रॉय :** प्रश्न बरोबर आहे. सध्याच्या परिस्थितीत हे डोंगरी जिल्हे आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण नाहीत हे खरे आहे. ज्याप्रमाणे केरळ, पाँडिचेरी, बिहार किंवा सर्व हिंदुस्तानच स्वयंपूर्ण नाही, त्याचप्रमाणे हे जिल्हेही नाहीत, भारत कुठे स्वयंपूर्ण आहे ? कोटयवधी डॉलर्सची परकीय मदत भारताला स्वीकारावी लागतेच ना ?

आणि शिवाय आमची खात्री आहे की, शहाणपणाने कारभार हाकला आणि व्यवस्थित योजना केली तर आम्ही आमच्या प्रदेशातील उत्पादन चांगलेच वाढवू शकू. त्यामुळे आमचे राज्य खरोखरच आर्थिकदृष्टया व्यवहार्य होऊ शकते.

**मी :** पण माझ्या माहितीप्रमाणे हे जवळ जवळ अशक्य वाटते. सध्याचेच आकडे असे आहेत की, या चारही डोंगरी जिल्ह्यांचा रेव्हेन्यू अवघा २२ लाखांचा आहे तर या जिल्ह्यावरील वार्षिक खर्च ११ कोटी ३५ लाख रुपयांचा आहे. उत्पन्न आणि खर्च यात एवढी तफावत असताना तुम्ही असे कसे म्हणू शकता ?

**श्री. रॉय :** खरी गोष्ट अशी आहे की डोंगरी प्रदेशाचे निश्चित उत्पन्न कुणालाच माहीत नाही. रेव्हेन्यूच्या आकड्यांवरून अंदाज येत नाही. दिलेले आकडे साधारणतः चुकीचे असतात किंवा काळजीपूर्वक मोजलेले नसतात. आणि मुख्य म्हणजे या चार डोंगरी राज्यांचे वेगळे असे उत्पन्न कधी मोजलेच गेले नाही. त्यामुळे आमच्या हिशेबानुसार या प्रदेशाची तूट भरून निघण्याची आम्हांला खात्री आहे. उत्पन्न वाढविणारा विकास घडवून आणला पाहिजे. या डोंगरी प्रदेशाची क्षमता फार मोठी आहे.

**मी :** तुम्हांला कोणत्या तऱ्हेचा विकास अभिप्रेत आहे ? क्षमता कोणती ?

**श्री. रॉय** : या सबंध डोंगरी जिल्ह्यांमध्ये अन्न, शक्ती, खनिजे आणि उद्योग-धंदे यांच्या वाढीसाठी फार मोठा वाव आहे. या प्रदेशाची लोकसंख्या त्या मानाने कमी आहे. मी अन्नतंत्रज्ञ आहे (फूड टेक्नॉलॉजिस्ट). आणि माझ्या माहितीच्या आधारे मी एवढेच सांगू शकतो की जर योग्य शास्त्रीय पद्धती वापरल्या तर धान्याच्या बाबतीत आमचे राज्य गरजेपेक्षा अधिक धान्योत्पादन करू शकेल. आम्हांला तशा सोयी मात्र मिळाल्या पाहिजेत. आतापर्यंत त्या आम्हांला मिळाल्या नाहीत. त्या जर मिळाल्या तर भात, बटाटा आदी अन्नाची या राज्यात चांगली निर्मिती होऊ शकेल.

**मी** : ठीक आहे. हे झाले आर्थिक प्रश्नासंबंधी. जर तुम्हांला एक डोंगरी राज्य मिळाले ......

**श्री. रॉय** : जर ? ' जर तर 'चा आता प्रश्नच नाही. ' जर ' आता उरलाच नाही. ती वेळ केव्हाच निघून गेली आहे. गेल्या ११ जानेवारीपर्यंत ' जर ' शिल्लक होता. आता नाही. आता आम्ही धरून चालतो आहोत की आमची मागणी मान्य झाली आहे, आम्हांला हवे ते मिळाले आहे. आणि आम्ही ते मिळवीत आहोत. आता दुसरा मार्ग उरला नाही.

( If ? There is no more if left now. It was so before January 11. Now the question does not arise. We take it granted, that we have got what we wanted. And we are getting it done Now there can be no other way. )

हे बोलत असताना श्री. रॉय यांनी मोठ्या अभिमानाने मान ताठ केली आणि जणू काय संमती मिळवावी या इच्छेने आजूबाजूला उभ्या असलेल्या आपल्या अनुयायांकडे पाहिले. तेही त्यांना दाद देत उल्हासाने उच्चारते झाले, " येस – येस. देअर इज नो अदर वे. वुई गॉट इट – हो – दुसरा मार्ग नाही. आम्हांला हवे ते मिळाले आहे. "

त्यांच्या या अधीरेपणाने, निश्चयी आक्रमक आवाजाने मी थोडा अवाक् झालो होतो. खरे म्हणजे मला विचारायचे होते की, जर तुम्हांला सर्व जिल्हे मिळून एक डोंगरी राज्य मिळाले तर सर्व पहाडी जमातींचे समाधान होईल का ? परंतु ' जर 'चा उच्चार त्यांना सहन होत नाही. आपले राज्य मिळाले आहे असेच ते लोक आता धरून चालले आहेत.

निवडणुकीच्या अगोदर केंद्र सरकारने त्यांच्याशी चर्चा करून आसाम राज्याची पुनर्रचना करण्याचे जाहीर आश्वासन दिले आणि आसामसाठी फेडरल पद्धतीची योजना तयार केली जाईल, असे सांगितले. परंतु तेवढ्यावरच आमची मागणी मान्य झाली आहे. आमचे वेगळे राज्य आम्हांला मिळाले आहे, असा प्रचार ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सने सुरू केला. आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातही

त्यांनी तेच सांगितले व निवडणुका लढविल्या. अजून योजना तयार व्हायची आहे.

शेवटी मी विचारलेच, " एका डोंगरी राज्याने न्बारही पहाडी जिल्ह्यांतील सर्व जमातींचे समाधान होईल काय ?"

थोडे थांबून श्री. रॉय म्हणाले, " आमची मागणी आसामातील सर्व डोंगरी प्रदेशांच्या वतीने आहे. आता प्रत्येक व्यक्तीला त्यामुळे समाधान वाटेल असे मी सांगू शकत नाही. तशी गोष्ट कुठेच घडत नाही. परंतु बहुसंख्य लोकांचे मात्र समाधान होईल –"

**मी :** भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने असे राज्य वेगळे करणे कितपत सोयीचे आहे ?

**श्री. रॉय :** आमची मागणी मान्य होणे यात आमच्याही लोकांचे आणि देशाचेही हित आहे. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही ते हिताचे आहे. आमचे वेगळे राज्य होणे आवश्यक आहे. तरच आम्ही देशाच्या विकासात काही तरी भर घालू शकू.

शेजारीच बसलेल्या त्या विधानसभेच्या सभासदाने पुस्ती जोडली, " सध्याची परिस्थिती म्हणजे आम्ही–आमचे डोंगरी जिल्हे हे–आसामच्या आणि देशाच्या गळ्यातील घोंड झालेले आहोत. आणि परिस्थिती अशीच राहिली तर शेवटपर्यंत आम्ही तसेच राहू. आम्हांला वेगळे राज्य मिळेपर्यंत हे असेच राहील. आम्हांला एकदा वेगळे राज्य मिळाले आणि आम्ही स्वतःची प्रगती करू लागलो की मग देशासाठी आम्ही काही तरी करू शकू !"

श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय यांना घाई होती. बाहेरच्या एका गावात त्यांना सभेसाठी जायचे होते. त्यामुळे घाईघाईतच त्यांनी निरोप दिला आणि ते निघून गेले.

मुलाखत संपवून परत निघालो तो मनात अनेक शंका–कुशंकांचा गोंधळ माजला होता. या पहाडी नेत्यांची मागणी मान्य केली तर सर्व काही सुरळीत चालेल का ? की त्यांची मागणी आणखी वाढेल ? फुटीरपणाची प्रवृत्ती त्यांच्यांत कितपत आहे?

## मिझोंनंतर आता खासी

डोंगरी राज्य चळवळीची जवळून पाहणी केलेला शिलाँगमधील एक पत्रकार म्हणाला, " या लोकांमध्ये म्हणजे खासी–गारो आदी जमातींमध्ये खरे म्हणजे भारतापासून एकदम फुटून निघण्याची प्रवृत्ती नाही. त्यांचे नेते हुशार आहेत. तसे करण्यात आपले हित नाही हे ते जाणतात. पण त्यांची वेगळ्या राज्याची मागणी मान्य झाली नाही तर त्यांच्यांतील एखादा कडवा गट कदाचित एकदम टोकाचा पवित्राही घ्यायचा. ती शक्यता अगदीच नाही असे नाही. "

आमची मागणी मान्य झाली आहे असे आता डोंगरी नेते सांगतात. मागणी मान्य व्हायची होती तेव्हा ते म्हणत, मागणी मान्य झाली नाही तर आम्ही चळवळ करू.

डायरेक्ट ॲक्शन घेऊ. आमची चळवळ अहिंसक राहील असेही ते सांगत. पण त्यांच्यावर कुणाचा विश्वास नव्हता. गेल्या ऑगस्टमध्ये शेकडो खासी आणि गारो तरुण पाकिस्तानमध्ये शिक्षणासाठी घुसल्याच्या बातम्या येत होत्या. पाकिस्तानातील खास शिबिरामध्ये या तरुणांना गनिमी युद्धाचे शिक्षण मिळत होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते परत येऊन मिझोप्रमाणेच बंडखोरी करतील ही भीती होती.

अजूनही ती भीती आहे. खासी लोकांचा टोकाचा कडवा गट शस्त्रास्त्रे जमा करीत असल्याच्या बातम्या आहेत. त्यामुळेच शिलाँगमध्ये भीतीचे आणि दशहतीचे वातावरण पसरले असते. उघड कुणी बोलत नाही. पण तोंडावर आडवा हात धरून कुजबुज करीत सारेच बोलतात. या लोकांना त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांचं वेगळं राज्य नाही दिलं तर ते नक्कीच बंड करून उठतील, असं सांगतात.

"मिझोंनंतर आता खासीच. खासी लोकांनी तर शस्त्रेही जमवायला सुरुवात केली आहे," असे जनसंघाच्या एका कार्यकर्त्याने मला गोहत्तीत सांगितले होते. शिलाँगमध्ये कुणी उघडपणे बोलत नसले तरी अस्पष्ट का होईना या म्हणण्याला दुजोरा मिळत होता.

दुसरा एक पत्रकार म्हणाला, "मिझो लोक वेगळं राज्य मागत होते. ते दिलं नाही म्हणून ते बंड करून उठले. आता कुणाची शाश्वती द्यावी ?"

शिलाँगचा आणखी एक पत्रकार म्हणाला, "आर्थिक वर्चस्व, राजकीय वर्चस्व वगैरे सर्व बाता झूट आहेत. हे खासी लोक चांगले सुशिक्षित आहेत. तसे सारेच पहाडी लोक आहेत. त्यामुळे शिलाँग सेक्रेटरिएटमधील सेवकांमध्ये ३९.७ टक्के लोक पहाडी जमातीचे आहेत. इतर खात्यांमध्ये ४० टक्के लोक पहाडी जमातीचे आहेत. वर्चस्वाच्या फुकट बाता त्यांनी मारू नयेत. कितीतरी खासी आणि मिझो मुले आय्. ए. एस्. साठी निवडली जातात. आसामचा मैदानी भागच त्या बाबतीत मागासलेला आहे. तो कसला वर्चस्व गाजवतो ! ही एक गोष्ट मात्र खरी आहे. सरकारने सामान्य पहाडी लोकांच्या आर्थिक विकासाच्या बाबतीत एवढा गोंधळ घातला आहे की ते लोक अधीर झाले आहेत. या लोकांच्या स्वतःच्या हाती कारभार दिला तर ते नक्कीच शहाणपणाने चालवून स्वतःची चांगली प्रगती करून घेतील या बाबतीत शंका नाही,"

## आमचे आम्ही खाऊ

हा पत्रकार पुढे म्हणाला, "खरे म्हणजे आसामचे लोक शहाणे असतील–मी आसामीच आहे–तर त्यांनी वेगळ्या डोंगरी राज्याला ताबडतोब मान्यता द्यायला हवी. त्यात दोघांचाही फायदा आहे. आसामचे कितीतरी जादा उत्पन्न–जे नेहमी या डोंगरी भागात जाते ते–वाचेल. आसामला स्वतःची प्रगती करून घेता येईल. या डोंगरी भागाला स्वतःचे दूध बाटलीने पाजण्याचा हट्ट आसामी का धरतात कळत नाही."

पण तशी चळवळ आसामात नुकतीच चालूही झाली आहे. 'फेडरल योजना नको. डोंगरी राज्य हवे असेल तर वेगळे करा. आमचे उत्पन्न आम्ही खाऊ,' अशी ही चळवळ आहे. आणि हळू हळू तिला गती येते आहे.

आसामच्या पहाडी प्रदेशांचा प्रश्न हा असा नाजूक आहे. वेगळे पहाडी राज्य देणे या शिवाय सध्याच्या परिस्थितीत दुसरा मार्ग नाही. पण वेगळे राज्य दिल्यावर तेवढयावरच या लोकांच्या आकांक्षांचे समाधान होईल याची शाश्वती नाही. सावरता येत नाही अशा रीतीने हा प्रश्न आपल्याच वजनाने घरंगळत चालला आहे. सावरण्याचे बरेच मोके गमावले.

तसे पाहता सारा आसामच घरंगळत असल्यासारखे वाटू लागते. वेगवेगळे गुंतागुंतीचे प्रश्न इतके हाताबाहेर जात आहेत की केव्हा स्फोट होईल आणि राज्याच्या चिंधड्या उडतील याचा नेम उरलेला नाही. राज्याचे तुकडे झालेले परवडले, पण भारताची आणखी शकले होणे टाळले पाहिजे असे म्हणण्याची वेळ येते. मिझो टेकडी जिल्हा हा आसामचाच भाग. नागालँडमध्ये शिकलेला धडा लष्कराने मिझो विभागात वापरला. लष्कराने मिझो बंडखोरांचा चांगला समाचार घेतल्याचे सांगतात. आता परिस्थिती वितळते आहे असेही सांगितले जाते. पण मिझो विभागातील परिस्थिती वितळते आहे न आहे तोच दुसऱ्या समस्या भुतासारख्या उठताहेत. नागालँडचे वेगळे राज्य झाले. पण त्यामुळे आसामची डोकेदुखी काही थांबली नाहीच. आसाम–नागालँड सीमा अद्यापही पेटती आहे.

अशांतता, असुरक्षितता, भीती, द्वेष, संशय, अविश्वास अशा काळ्याकभिन्न ढगांनी आसामचे आभाळ भरून आले आहे. भवितव्यात काय वाढून ठेवले आहे याची कुणाला खात्री नाही. सुरक्षा, पहाडी जमातींची कटकट, फुटीरपणा, घुसखोरी, आसामियांची आढयताखोर अस्मिता, आपसातील भांडणे, सत्तास्पर्धा, भाषिक भांडणे यांच्या कचाटयात आसाम एवढया विचित्र तऱ्हेने सापडलेला आहे की, देशातील सर्वाधिक कटकटी, सर्वाधिक अस्थिरता याच राज्यात आहेत. आसामच्या दूरत्वामुळे ही झळ इतर भारतात सहसा पोचत नाही. त्यामुळे कुणाला आसामच्या या व्यथांचे गांभीर्यही लक्षात येत नाही. कोणत्या दिशेने आसाम वाहत आहे हे ध्यानात येत नाही.

पण कधीतरी–आणि लवकरच–आसामचे हे सारे प्रश्न एकाएकी रुद्र स्वरूप धारण करतील आणि सारे हिशेब मोडून टाकतील. आसामातील परिस्थितीच हा सावधगिरीचा इशारा देते. सुरुवातीस मनोहर वाटणारे आसामातील निळे डोंगर, हिरवी घनदाट जंगले, लाल नद्या यांच्यावर मग या परिस्थितीची दाट सावट पडल्यासारखे वाटू लागते आणि मन विषण्ण होते.

**समाप्त**

२० मे १९६७

# पुस्तक

‘कोंडुरा’ टेबलावर पडली होती. तांबड्या रंगातील ‘कोंडुरा’ ही अक्षरे, रिव्हर्स-मधील लेखक ‘चि. त्र्यं. खानोलकर’ ही अक्षरे आणि आकृतिहीन, गूढगंभीर रंग. गूढ असले तरी उदासीनता व्यक्त करणारे आणि गंभीर असले तरी विचार करायला लावणारे.

रात्रीचे दोन सहज वाजून गेलेले होते. सारे घर निद्रिस्त, शांत होते. मुलांच्या घोरण्याचा आणि बायकोच्या संथ श्वासाचा आवाज एक-मेकांत मिसळून गेलेले होते. झोपण्याच्या खोलीत मी नुकताच अंधार केला होता. ‘कोंडुरा’ वाचून संपविली होती आणि तिला टेबलावर टाकून मी कॉटवर अंग टाकले होते. झोप येत नव्हती आणि मन अस्वस्थ झालेले होते.

एक संवाद मनात घोळत होता :

“...म्हातारीनं पुन्हा त्याच्या रुंद छातीवर हात ठेवला. तात्याचं घोरणं स्प्रिंग तुटल्यासारखं बंद झालं. त्यांनी डोळे उघडले. धडपडून उठले. काळोखात त्यांनी निरखून पाहिलं.

“म्हातारे ! ”

“हळू बोल ! ”

“काय ?”

“जात का नाहीस तिकडे ?”

“इच्छा होत नाही. ”

“हळू बोल. तिनं काय केलं ?”

“काही नाही. ”

“ती काही बोलली ?”

“नाही. ”

“मग असं का ? त्या पोरीनं काय करावं ? सबंध रात्र तुझी वाट पाहत भिंतीशी टेकून बसते. ”

“मला हुकूम नाही. ”

“कुणाचा ?”

“कोंडुऱ्याचा ! ”

# अगम्य, गूढगहन जीवनाचे आव्हान स्वीकारणारी 'कोंडुरा'

—वि. शं. पारगावकर

[कोंडुरा : चिं. त्र्यं. खानोलकर

मौज प्रकाशन गृह, मुंबई

पृष्ठे १५३ : मूल्य : सात रु.]

" म्हातारीनं दोन्ही गालांवर सुक्या बोटचा लावून काळोखात कोंडुऱ्याच्या दिशेनं हात जोडले.

" तिचं नशीब!" म्हातारी कुजबुजली. काळोखातून चाचपडत आत निघून गेली.

हाच तो संवाद. 'कोंडुऱ्या'सारखा मनात घोघावत आहे. कोंडुरा हा त्या कोकणातल्या गावचा देव. कोंडुरा हे लोकांचे दवत. एक तुटलेला मोठा कडा आणि घोघावणाऱ्या समुद्राच्या प्रचंड लाटा म्हणजेच 'कोंडुरा'. कोंडुरा म्हणजे एक रहस्य. विश्वाचे रहस्य, आसमंताचे रहस्य, गावकऱ्यांचे रहस्य, गावकऱ्यांच्या जीवनावर आलेली एका रहस्याची, गूढतेची साय–किंवा तवंग म्हणा हवे तर!

खानोलकरांची ही एक कादंबरी. खानोलकर हा लेखक कादंबरीकार म्हणून विशेष कोणाला आवडला नाही. 'एक शून्य बाजीराव' या त्यांच्या नाटकावर तर भल्याभल्यांनी कडाडून टीका केलेली. मान्यवर टीकाकारांनीदेखील. या लेखकाची 'रात्र काळी घागर काळी' ही कादंबरीदेखील अशीच वाया गेली! मान्यवर टीकाकारांच्या लेखी. तसेच 'कोंडुरा'चे होणार ही भीती. अर्थात लाकडी सोंगट्यांप्रमाणे जे लेखक जीवन उभे करतात तसे जीवन खानोलकरांना उभे करता येत नाही. जीवनाचा एक साधा, सुबक, सवंग आलेख काढून कादंबरीला रूप देण्याचे जे एक सर्वसामान्य तंत्र, तेही या गृहस्थाला अवगत नाही.

'अहो, तुमच्या कादंबरीचा विषय काय?' म्हणून याला विचारलं तर तो डोळे गरागरा फिरवील आणि मग फक्त खाली पाहू लागेल यात काहीच शंका नाही. कारण त्याच्या कादंबरीला कथानक नसते; 'कोंडुरा'लाही नाही!

आणि तरीही ती कादंबरी आहे! 'कादंबरी म्हणजे काय हो?' 'कादंबरी लेखन : तंत्र

आणि मंत्र ' असं एखादं पुस्तक हाताशी घेऊन हा प्रश्न आज सोडविता येणार नाही; कारण उघड आहे. कालिदासापासून शेक्सपीअरच्या नाटकांसारखी आजची 'माणूस नावाचे बेट' किंवा ' एक शून्य बाजीराव ' ही नाटके आहेत काय ? नाहीत. तरी त्यांना तुम्ही-आम्ही नाटक म्हणूनच पाहतो. कुणाला ही नाटके फडतूस वाटत असतील तर असोत. तो मुद्दा महत्त्वाचा नाही. ती नाटकं आहेत हा महत्त्वाचा आहे. तशीच ' कोंडुरा ' ही कादंबरी आहे. तूर्त एवढेच पुरे !

*खानोलकरांची कादंबरी वाचून असा प्रत्यय येतो की हा गृहस्थ कशाने तरी झपाटला गेल्याशिवाय लिहीत नाही. नाजूकपणा, एकसंधपणा, पात्रांचा विकास, त्यांची आवक-जावक या साऱ्या बारीक सारीक तपशिलांचा आधी विचार करून, त्यांची योजना करून हा लेखक कादंबरी लिहीत नाही. त्याच्या जीवनाला भरती येते आणि त्याच्या प्रतिमेची सरिता बेफाम होऊन दुथडी वाहू लागते. मग त्या प्रवाहात अनेक जीवने येतात, अनेक प्रतिमा येतात, काही काव्याचे झरे तिला येऊन मिळतात आणि काही मिळमिळीत, बिलबिलित, मिश्री जीवने तिच्यापासून दूर पळतात. मग कुठे तिचे पात्र रुंदावते आणि ओढ कमी होते. तिथे जीवन नितळ बनते; इतके की वरचे निळेनिळे आकाश आणि आकाशातले पूर्णाकृती चंद्रबिंब या जीवनात अलगदपणे उमटते*

*अशा या साऱ्या वेगांनी, आवेगांनी, बिंबांनी आणि प्रतिबिंबांनी खानोलकरांची कलाकृती समृद्ध होते. तिच्यात व्यक्त झालेले जीवन कधी काव्यात मनसोक्तपणे डुंबून निघालेले असते, तर कधी नाट्याचे जळजळीत रूप त्याला लाभलेले असते. खानोलकरांच्या कादंबरीला कथानक नसते. कथानक नसते म्हणजे सनातन कथानक नसते. तसेच खानोलकरांच्या कादंबरीतील पात्रे आपल्या रूपाने वाचकांच्या डोळ्यात भरत नाहीत. ' कोंडुरा'मधील तात्या, अनसूया, म्हातारी, वि ष्णू किंवा इतर कितीतरी ठळक-पुसट व्यक्ती. त्यांची नावं लक्षात राहतील, त्यांचे गुणधर्म कळतील; परंतु ही हाडामांसाची माणसे म्हणून आपण त्यांना स्पर्श करायला जाऊ, हात लावायला जाऊ तर आपला हात आरपार निघून जाईल ! थोडक्यात म्हणजे खानोलकरांची पात्रे डोळ्यांना दिसणार नाहीत, हाताला लागणार नाहीत, पण ती आपल्या हृदयाला जाणवतील— भिडतील !*

खानोलकरांची कलाकृती आपले स्वतःचे एक नवेच विश्व उभी करते. तेवढी ताकद तिच्यात खास आहे. परंतु त्यांचे हे विश्व अत्यंत धूसर, अत्यंत गंभीर, अत्यंत

अगम्य आणि अत्यंत निराशावादीही आहे !

या दृष्टीने पाहता त्यांची कलाकृती खऱ्या अर्थाने जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या अधिक जवळ जाते. रूढ अर्थाने माणसे जे जीवन जगत असतात, त्या जीवनाचा कादंबरीत आविष्कार म्हणजे वास्तवता. ही समजूत चुकीची; अतएव भंपकपणाची आहे ! कोटचवधी लोक दररोज जे जीवन जगत आहेत त्या जीवनाचं चित्रण करण्यासाठी कलाकृतीची काय गरज आहे ? एखादा चांगला कारागीरही ते काम करू शकतो ! कलावंत ज्या जीवनाचे आव्हान स्वीकारीत असतो ते जीवन साधंसुधं असतच नाही. ते अलौकिक असू शकतं, अगम्य असतं.

अशा जीवनाचं विश्लेषण आपल्याला करता येईल किंवा कसे ? अशा जीवनांना पडलेल्या प्रश्नांना उत्तरे असतात किंवा काय ? सौंदर्य सौंदर्य म्हणून ज्याला आपण म्हणतो ते तरी खरे काय असते ? देव, धर्म, रूढी, रीतिरिवाज, नाती-गोती या साऱ्या साऱ्यांचा अर्थ कशावर आधारलेला आहे ? आणि खरोखर याला काही अर्थ असतो का ?

'कोंडुरा' कादंबरी वाचल्यावर या साऱ्या विचारांनी डोके भणाणून जाते, सुन्न होते, तप्त होते, अस्थिरतेच्या विवरात गिरक्या घेऊ लागते. 'कोंडुरा' या दैवताने झपाटलेला पर्शराम, त्याची दुर्दैवी बायको, विहिरीत काम करणारे मोलमजूर विष्णूच्या दृष्टीतला तिरस्कार, म्हातारीची साध्या-सालस जीवनातून उफाळून वर आलेली तळमळ, पर्शरामला मिळालेली गर्भ जिरण्याची मुळी, या साऱ्या गोष्टी या साऱ्या घडामोडींतून 'कोंडुरा' आकार घेते. पाणी लागावे म्हणून पर्शराम विहीर खणण्याचे काम हाती घेतो आणि पाणी लागू नये म्हणून ते अर्ध्यावरच टाकून देतो. आपल्या बायकोजवळ तो झोपायला जात नाही; कारण त्याला 'कोंडुरा'ची तशी आज्ञा नाही !

वर वर पाहता या कादंबरीत सारेच विपरीत आहे; विचित्र आहे. इतकेच नव्हे तर प्रथम प्रथम ही कादंबरी वाचवतही नाही. बळ धरून, जिद्द करून ती वाचावी लागते. अर्थात ज्याला बळाचा आणि जिद्दीचा वापर करायचा नसेल त्यांनी 'कोंडुरा'च्या वाटेला मुळीच जाऊ नये. दुसरे म्हणजे ज्याला नाकासमोरचेच जीवन ओळखण्याची सवय आहे, त्याने नाक हुळहुळे करणाऱ्या 'कोंडुरा'मधील जीवनाच्या वाटेला जाऊ नये हेच चांगले. ज्याला जीवनाची ओळख एक अधिक एक म्हणजे दोन एवढीच पटलेली आहे त्याने अशा विपरीत, विचित्र, गूढ जीवनाच्या मागे धावू नये.

आपल्याकडे वाङमयामधला असा एक संप्रदाय आहे, जो आपलं नातं ज्ञानेश्वर–तुकाराम यांच्याशी जोडतो. तो म्हणतो, "माणसाने शुद्ध लिहावे, सात्त्विक लिहावे, साजूक तुपासारखे लिहावे !" त्या संप्रदायाचे हे म्हणणे त्याच्यापुरतेच खरे आहे; कारण साजूक तुपासारख्या जीवनापलीकडे त्याची दृष्टीच जाऊ शकत नाही. आज तीनशे कोटी लोक या जगात जीवन जगत आहेत. त्या जीवनात तीनशे कोटीची

विविधता आहे. तरीही माणसाला अजून जीवन म्हणजे नेमके काय हे कळलेलेच नाही! ते समजून घ्यायचे असेल तर घराची दारे, खिडक्या सताड उघडचा टाकून चहू दिशांनी येणारा प्रकाश झेलला पाहिजे.

खानोलकरांची 'कोंडुरा' ही हा प्रकाश झेलण्याचे काम करीत आहे. प्रकाशाला रूप नसते तसे त्यांच्या कादंबरीला रूप (Form) नाही. नसेना का. खानोलकर शब्द उभे करतात आणि अनंत दिशांनी येणाऱ्या जीवनांचा प्रकाश त्या शब्दांमधून आरपार फिरवितात. जणू या प्रकाशातच त्यांचे शब्द ओवलेलेले असतात. गंगाधर गाडगीळ यांनी 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' उभी केली. त्यापूर्वी असे जीवन आणि त्या जीवनाला सामावून घेणारी अशी एखादी कथावस्तू असू शकते यावर या पुराणमतवादी संप्रदायांचा विश्वासच नव्हता, परंतु गाडगीळांच्या प्रतिभेने ते आव्हान स्वीकारले होते. जशी त्यांनी 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' लिहिली, तसाच 'काजवा-' तील अत्यंत गूढ तितकाच कठीण अनुभव साकार केला.

खानोलकरांनी रुळलेला मार्ग सोडलेला आहे. त्या मार्गावरील त्यांची पहिली कादंबरी म्हणून 'कोंडुरा' मला उल्लेखनीय वाटते. त्यांच्या भाषेविषयी, प्रतिमांविषयी अथवा कथावस्तूविषयी निराळे लिहिण्याची गरज नाही. कारण हे सारे मिळूनच 'कोंडुरा' आहे, एवढे म्हटले म्हणजे पुरे आहे!

●


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड

राजगड पुरंदर आग्रा

मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

# भिंतीच्या पैंबड्या

सुधाकर राजे

## □ काव्याचा पेग

कविता करायला काय लागते ? कागद-पेन्सिल लागते, छपाईचे आश्वासन देणारा संपादक लागतो, प्रसंगी पाच–दहा रुपयांच्या चेकचे अमिष लागते. या झाल्या परंपरागत गोष्टी. काही नवीन गोष्टी लागतात हेही काही दिवसांपूर्वी कळले होते. उदाहरणार्थ, कॉम्प्यूएट–कवीला 'प्रोग्राम' करू शकणारे इलेक्ट्रॉनिक इंजिनियरचे ज्ञान किंवा कुठल्याही इन्स्टंट कवितेत फिट बसू शकतील असे शब्द वर छापलेल्या पत्त्यांनी रमी खेळण्याची हौस. पण यालाही आठ-पंधरा दिवस झाले. आता कविता करायची असेल तर काव्याचा डोस घ्यावा लागतो. लंडनच्या एका वाचकाचे पत्र प्रकाशित झाले आहे. त्यात तो म्हणतो. 'मी मांत्रिक काव्य' या विषयावर पुस्तक लिहीत असून त्यांत भ्रम निर्माण करून काव्य-लेखनाला मदत करणाऱ्या औषधांवर एक स्वतंत्र प्रकरण लिहिणार आहे." कॉलेजात असताना साहित्याचा विद्यार्थी या नात्याने माझ्यासारख्या गद्य माणसालाही काव्याच्या अनेक प्रकारांची नाइलाजाने तोंड-ओळख करून घ्यावी लागली होती. तरी काव्याची ही छू:मंतर व्हरायटी आपल्यालाही ब्रँड-न्यू आहे. आणि भ्रम निर्माण करणारे औषध असा आडवळणी शब्दप्रयोग का ? सरळ व्हिस्की म्हणायला काय झाले ? ईश्वराचे चिंतन आणि व्हिस्कीचा पेग या दोन्ही गोष्टींनी ब्रह्मानंदी टाळी लागते. (असे सांगणारे सांगतात) तेव्हा पहिल्या प्रकारातून ईश्वरप्राप्ती होते तशी दुसऱ्या प्रकारातून काव्यप्राप्ती होत असणे अशक्य नाही. पण कुठले काव्य लिहिण्यासाठी किती अन् कुठली चढावी लागते हा संशोधनाचा विषय होईल. इम्पोर्टेड चढली तर फ्री व्हर्स येईल, उलट हातभट्टीची चढली तर लोकगीत तयार होईल. आणि एका पेगने एक कडवे लिहिता आले तर महाकाव्य लिहायला किती ठासावी लागेल याचे त्रैराशिक न मांडलेलेच बरे ! काही असले तरी उद्या माझी कविता 'माणूस'मध्ये दिसली तर रसास्वाद घेणाऱ्याने खुशाल समजावे– बेट्याला कोकाकोला चढला !

## □ एप्रिल–फूल की आषाढ–मूर्ख ?

परमेश्वर दिसायला कसा आहे याची मला नीटशी कल्पना नाही. पण तो बहु- तेक गोऱ्या साहेबासारखा दिसत असावा अशी मला दाट शंका येते; कारण अक्कल

वाटतानाही त्याने गोऱ्या साहेबाचे संकेत पाळलेले दिसतात. दोन ब्रिटिश मानसशास्त्रज्ञांनी नुकताच असा शोध लावला आहे की एक एप्रिलच्या जवळपास जन्माला आलेल्या माणसांना जात्याच अक्कल जरा कमी असते. पाहिलेत? त्यापेक्षा अधिक सढळ पुराव्याची कोर्टातदेखील गरज नाही. एप्रिल, मे, जून हे सगळे साहेबांचे कॅलेंडर, ते एरव्ही देवाला कसे कळले असते? शंकाच नको, देव कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये शिकला असला पाहिजे आणि त्याच्यावर बऱ्याच वेळा एप्रिल–फूल होण्याचा प्रसंग आला पाहिजे, त्याचा हा सूड.

पण इंग्लंड-अमेरिकेतल्या माणसांचे सोडा. माझ्यासारखा 'काळा आदमी' जन्माला घालतानाही केवळ माझा जन्म एप्रिल एकच्या जवळपास झाला म्हणून देवाने माझा असा घात करणे कितपत योग्य आहे? माझ्यासारख्या 'तरुण देशी' माणसालाही हे इंग्रजी नियम लागू पडू लागले तर मग देव आणि गॉड यांच्यांत फरक तो काय राहिला? आता माझ्या डोक्यातली जागा केवळ एप्रिलमध्येच नव्हे तर वर्षभरच रिकामी असते, असे आमच्या हिच्यापासून तमाम शेजाऱ्यांपर्यंत सर्वांचे मत आहे हे सोडा. महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे माझ्या डोक्यातली पोकळी ही अस्सल भारतीय आहे. तेव्हा मला एप्रिल-फूल म्हणवून घेण्यात नामुष्की वाटेल; उलट आषाढ–मूर्ख किंवा चैत्र-मूर्ख असे काही तरी म्हणवून घेण्यात अभिमान वाटेल. वाटल्यास अधिक मासातला अधिक-मूर्ख म्हटले तरी पर्वा नाही.

## □ कुत्र्याचे नैतिक जिणे

एकंदरीत पाहता आधुनिक जगाचा नैतिक अधःपात फारच झाला आहे याबद्दल दुमत नाही; पण ही खाली गेलेली नैतिक पातळी कशी उंचावता येईल याबद्दल मात्र मतेच मते आहेत. त्यामुळे समाज-सुधारणेच्या कार्यक्रमात जेवढी व्हरायटी आहे तेवढी साड्यांच्या डिझाईनमध्येदेखील नसेल. त्यांत अगदी नुकतीच एक भर पडली आहे ती मात्र चारी मुंड्या चीत करणारी आहे. ती म्हणजे इंग्लंडमधल्या एका नगरपालिकेने कुत्र्यांसाठी निराळ्या मुत्र्या बांधल्या आहेत! आता कुत्र्याचे जिणे नैतिक होण्याची सोय केल्यावर मांजराला अनैतिकतेच्या क्षेत्रात लोळू देणे कुठवर योग्य आहे? आणि जेथे मोत्या जाणार तेथेच चंपीदेखील? शिव, शिव! हे तर अनैतिकतेलाच उत्तेजन ठरेल. तेव्हा सुसंस्कृत कुत्र्यांनी याच्याविरुद्ध चळवळ करावी. कुत्रे आणि कुत्र्या यांच्यासाठी निराळ्या मुत्र्या तर हव्याच, पण कुत्रीच्या मुत्रीवर स्पष्ट लिहिलेले असावे–" डॉग्ज नॉट अलाउड. ओन्ली बिचेस!"

●

## मनोरंजनाची भट्टी जमलेले

# जादुगार नयन

महाराष्ट्र राज्य नाट्य-महोत्सवातून जे कलावंत नावारूपास आले त्यांमध्ये पुरुषोत्तम दारव्हेकर यांचा क्रमांक फार वरचा आहे.

नाटचाच्या मनोरंजनात्मक अंगाला धक्का न लावता सरकारी चौकटीत 'फिट्ट' बसेल असे नाटक उत्कष्ट कलावंतांच्या संचात सादर करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे.

नाटच-महोत्सवाच्या अंतीम फेरीमध्ये प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेले 'नयन तुझे जादुगार' या नाटकामध्येही दारव्हेकरांनी आपली पूर्वपठिका कायम ठेवली आहे.

बस्तारच्या परिसरात चेटुक–माटुक करणाऱ्या चेटकिणीची एक कन्या आपल्या मातृ-व्यवसायाबरोबरच आधुनिक पद्धतीचे शिक्षणही घेत असते.

चेटकीण प्रेमात पडली की तिची विद्या आटते याचा या शीलाला विसर पडतो स्वत:च्या घरामध्ये भाडेकरू म्हणून राहणाऱ्या शेखरचे ठरू घातलेले लग्न आपल्या मंत्रसामर्थ्याने मोडून ती स्वत:भोवती त्याला गुंतवून ठेवते. यथावकाश खरोखरीच प्रेमात पडते.

प्रेम व मांत्रिक शक्ती यांच्या झगडयात प्रेमाचा विजय झाल्याबरोबर मंत्र-सामर्थ्य आटते. याच वेळी शेखरला आपली भावी पत्नी एक चेटकीण असल्याचे समजते. भावना व प्रेम या कल्पनाही शीलाच्या बाबतीत आपल्या मनात नसताना केवळ मंत्रसामर्थ्याने शीलाने आपल्याला वश केले, हे समजताच शेखर अत्यंत अस्वस्थ मन:स्थितीत घर सोडतो.

शीलाची अवस्था केविलवाणी होते. चेटकिणीतले चेटूकपण नाहीसे होते. आणि साधी स्त्री झाल्यावर प्रियकर निघून जातो. परंतु दैव इतके निष्ठुर नसते. शीलाला पुन्हा मंत्रसामर्थ्यसंपन्न करण्यासाठी जंगलचा आदिवासी महाराजा येतो आणि याच वेळी भाडयाची जागा खाली करून जाणारा शेखर येतो. शीलाची बदललेली अवस्था त्याला चांगलीच जाणवते. चष्मा लावून मास्तरीण झालेली शीला एक सामान्य स्त्री आहे याची खात्री होताक्षणीच तो शीलाचा स्वीकार करण्यास तयार

होतो. आदिवासी महाराजा निराश होऊन निघून जातात. शीला-शेखरच्या साध्या संसाराला सुरुवात होते.

मूळ कथानकामध्ये वेडसर प्रोफेसर, त्याचा चिटणीस पतंगे व शीलाची मावशी या तिघांचे तृतीय दर्जाचे उपकथानक गुंफलेले आहे. त्याखेरीज फुलवा व प्रसाद यांचे दुय्यम उपकथानकही मूळ कथावस्तूस परिपोषक ठरेल अशा बेताने हळुवारपणाने सोडलेले आहे.

दारव्हेकरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे नाटक निश्चितपणे हलके फुलके व मनोरंजनप्रधान आहे. आपली नाट्यकृती स्वतंत्र नसून 'आधारित' असल्याचेही ते मान्य करतात. आधार कुणाचा व किती हे शोधण्याची कामगिरी त्यांनी चोखंदळ प्रेक्षकांवर, समीक्षकांवर सोपवली असली तरी अकारण आधार शोधत जाण्याची गरजच पडू नये इतक्या सफाईदारपणे त्यांनी आपल्या नाट्यवस्तूचे मराठीकरण केले आहे.

मनोरंजनप्रधान नाटक म्हणून पाहावयाचे ठरल्यावर प्रेक्षक निश्चितपणे संतुष्ट होतो. कथावस्तू, उत्तम कलावंत व नेटका प्रयोग या तिन्ही बाबतींत दारव्हेकरांना प्रेक्षकांनी दिलखुलास दाद दिली. नागपूरच्या परिसरातून कलावंत निवडायचे व त्यांच्यावर मेहनत घेऊन त्यांना पुण्या-मुंबईच्या कसबी कलावंतांशी सामन्यासाठी उभे करायचे हे सामान्य काम नव्हे. दारव्हेकरांचे या बाबतीतील श्रम वाखाण्यासारखे आहेत. 'रंजन कलामंदिर'च्या रंगभूमीवरून राजा पाठक, गणेश सोळंखी, नलिनी शर्मा यांसारखे कलावंत त्यांनी रसिकांसमोर आणले. 'नयन तुझे जादुगार' या आपल्या नाटकातून त्यांनी अनेक नवीन कलावंत रंगभूमीवर उभे केले. या कलावंतांचा उल्लेख दारव्हेकर धाकट्या पातीतील कलावंत असा करतात. परंतु कलागुणांच्या दृष्टीने पाहता त्यांचा हा संच कलानिपुण असलेला उत्कृष्ट संच आहे

नाटकावर एका व्यक्तिरेखेचा फारसा प्रभाव पडणार नाही व सर्व कलावंतांना कामगिरी बजावण्यास उत्तम संधी मिळेल याची दिग्दर्शकाने दक्षता घेतली आहे. वास्तविक दारव्हेकरांचे हे नाटक शीला सहज खाऊ शकेल. परंतु आपल्या प्रयोगातून शीलाचे काम करणाऱ्या उषा राजे यांना भरपूर वाव देऊनही हे केवळ त्यांचेच नाटक ठरणार नाही व मिळालेले यश सांघिक राहील, अशी दक्षता दारव्हेकरांनी घेतली आहे.

वेडगळ प्रोफेसरांची भूमिका अमहाराष्ट्रीय गोपाळ नायडू यांनी महाराष्ट्रीय कलावंतांनाही जमणे कठिण जाईल अशा पद्धतीने साकार केली आहे.

दारव्हेकरांचे नाटक व त्यांचाच प्रयोग यांचा मेळ बसल्यानेच या स्पर्धेतील सर्वोत्तम यश मिळवून गेले हे विसरता येणार नाही. त्यांच्या नाट्यवस्तूपेक्षा प्रयोग सरस वाटतो याचे श्रेय त्यांचे दिग्दर्शनकौशल्य व उत्तम नटसंच यांना द्यावे लागेल.

संशोधनग्रस्त वेडसर प्रोफेसर व शीलाची मावशी यांना एका माळेत गुंफ-

[ पृष्ठ ६० पाहा ]

# रडके मेहरबान

ए. व्ही. एम्. चा चित्रपट. मग रडारड आलीच. बाकी कोठलाही दाक्षिणात्य चित्रपट पाहा– 'भाभी', 'घराना', 'खानदान', सगळे एकाच खानदानमधले ! अपवाद फक्त 'दिल एक मंदिर' चा. 'डोमेस्टिक ड–रा–मा ऽऽ' ही खास इंडुगुंडूची 'माना ऽ पल्ली' (MONOPOLY)

...एक लक्षाधीश. मनासारखे कुटुंबही मोठे. घरच्या अन् बाहेरच्या लोकांनी घर अक्षरशः भरलेले ! अकस्मात शेअरबाजारात इस्टेट गडप ! कफल्लक. गूळच संपल्यावर माशांचे काय काम? पोटची पोरेही दुरावतात. परकीच मदतीला धावतात. कन्हैया–एक सापडलेला मुलगा. भोळा, भावनाप्रधान. 'मामा' वर जीव. पैसा गेला. काळ बदलला. 'आपली' माणसेही बदलली, पण कन्हैया नाही बदलला !

पुढे सारं असह्य होऊन लक्षाधीशाचा मृत्यू. बायको अत्यवस्थ. तिला वाचवण्यासाठी 'कन्हैया'ची धावपळ. देवालाही दया येते. (प्रेक्षकांची?) तो एक अपघात 'घडवतो' त्यातून लक्षाधीशाची हवेली लिलाव करायला निघालेल्या सेठजींचे हृदयपरिवर्तन. पूर्वी मोडलेलं सुदेशकुमार–भारतीचे (ज्युनियर) लग्न.

रडून रडून थकलात. आता हसायचं– (कोणाला ?–निर्मात्याला की स्वतःलाच ?)

'कन्हैया' ची भावडी पण प्रांजल व्यक्तिरेखा बऱ्यापैकी. पण चोरलेली. 'खानदान 'मधील पंगूला यात पाय फुटलेत हाच काय तो दोन्ही व्यक्तिरेखांमधला फरक. अशोककुमार व सुलोचना यांचा जिवंत व अभिजात अभिनय. हाच काय तो डोळ्यांत भरणारा भाग. सुनीलदत्तचा अभिनयही बरा. नूतनला 'नो स्कोप अॅट ऑल !' रमेश देव नुसताच पाईप ओढतो. तोही त्याला नीटपणे धरता येत नाही ! मेहमूदचा 'गाढवांचा मोर्चा.' ऊठसूट मोर्चे काढणाऱ्यांना चपखल चपराक. सिगरेट सोडताना अशोककुमारची होणारी तगमग अर्थपूर्ण !

हे ढीगभर ग्लिसरीनच्या अश्रूंत चमकणारे काही मोती ! एरव्ही सारे अश्रूच. तेही नकली–बेगडी !

'हसणारा प्राणी' अशी आजवर मानव प्राण्याची व्याख्या. पण 'मेहरबान' पाहून तो खरा 'रडणाराच' प्राणी आहे, हा 'साक्षात्कार' घडतो! व मग नकळत आपणही रडतो– कारण असले रडतराऊत चित्रपट काढणारेही 'आपलेच' आहेत म्हणून ! [पृष्ठ ६४ पाहा]

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## □ वन वे ट्रॅफिक !

'ग्रंथ हेच आपले गुरू ' असं म्हणत मित्राकडून एखादं पुस्तक वाचायला म्हणून आपण आणतो आणि ते परत करायला मात्र नेमके विसरतो. म्हणजे त्याचं काय आहे? नाही लक्षात राहत कामाच्या धांदलीत. म्हणजे 'ॲक्चुअली' हेच कारण नसतं. परंतु असे म्हणण्याचा संकेतच आहे ना !

एकदा आम्ही सहजच फिरत दिल्लीच्या प्रसिद्ध पुस्तकालय– कैसरबागेजवळचे किताबी दुनियाला–भेट दिली व नेहमीच्या सवयीप्रमाणे पुस्तके चाळीत मालका-विषयी आस्था दाखविण्यासाठी म्हटलं, "क्यों भाई 'बिझिनेस' का क्या हाल है ? '

" बस 'हाल' ही हाल है साब. " चेहरा टाकीत मालक म्हणाले. पण माझ्या डोक्यात काही प्रकाश पडेना !

" क्यों ? क्या हुआ भाई ? बिक्री कम हो गई है क्या ?" मी विचारलं.

" अजी वैसे ही तो बिक्री पहलेसेही कम हुई थी। लेकिन जबसे यह रास्ता 'वन वे ट्रॅफिक' हुआ है– बिझिनेस तकरीबन बैठ ही गया है। "

" क्यों ? वन वे ट्रॅफिक से बिक्री का क्या तआल्लुक ?"

तो हसला. उदासवाणं, हृदयाला घर पाडणारं, हसू होतं ते !

" साब, किताबें कब खरीदी जाती हैं ? सब जरुरतें पूरी होने के बाद ! जरु-रतों में सिनेमा, स्नो-पावडर सभी शामिल है। फिर ऐसे एक तरफ की वन वे ट्रॅफिक की दुकान की तरफ ख्याल देनेके लिए लोगों के पास वक्त ही कहाँ है।"

उर्दू भाषेला फुलायला–फळायला संधी मिळावयास हवी, म्हणून कंठशोष कर-णाऱ्यांना आमचा सवाल आहे, 'तुम्ही स्वतः त्यासाठी काय काय करीत आहात ? उर्दूचं एखादं पुस्तक तरी तुम्ही महिन्याकाठी खरीदता काय ?'

उर्दूचा वाचकवर्ग कमालीचा घटला आहे, हे एक कटू सत्य आहे. १९४८ साली मौ. अबुल कलाम आझाद यांनी लखनौच्या 'मकतबे जमियां'ची एक शाखा अमीनाबाद येथेही उघडली होती; परंतु आज त्या संस्थेचे रूपान्तर 'हिंदी बुक डेपो'त झाले आहे.

मुंबईची 'ताज' प्रकाशन संस्था सोडली तर उर्दू पुस्तके प्रकाशित करण्याचे धाडस अन्य कोणी करीत आहे काय ?

बिचारे विक्रेते 'अलीफ–लाम–मिम' ची पुस्तके विकून आपला चरितार्थ येन-केन प्रकरणे चालवीत आहेत! उर्दूची वर्षाकाठी ५०० पुस्तकेही खपत नाहीत! ऑल इंडिया रेडिओ व चित्रपटसृष्टी नसती तर उर्दू भाषेतील साहित्यिक, पत्रकार इत्यादींना अक्षरक्षः उपवास घडले असते!

आमचे उर्दू–प्रेमी 'उर्दू कॉन्फरन्स' किंवा 'मुशायरा' (कविसंमेलन) यांसारख्या कार्यक्रमांवर हजारो रुपये खर्चतात, परंतु महिन्याला २ रुपयांचे एखादे पुस्तक घेण्याचे त्यांच्या जीवावर येते!

मागे मौ. राशुद्दल खैरी व ख्वाजा हसन निझामी यांनी उर्दूच्या उत्कर्षासाठी एक योजना सादर केली होती. लग्नादी कार्यक्रमावर इतका पैसा खर्च केला जातो. तेव्हा त्या वेळी १००–१५० रुपयांची पुस्तकेही मुलीबरोबर 'दहेज' (आंदण) म्हणून द्यावीत म्हणजे त्यामुळे उर्दू वाङमयाच्या प्रसाराला हातभर लागू शकेल! परंतु नेहमीप्रमाणे ही योजना कागदावरच राहिली.

उर्दूला वाचविणे उर्दूवाल्यांच्याच हाती आहे. त्यासाठी अस्मानातून कोणी 'फरिश्ता' येणार नाही!

'परचम–इ–हिंद' (दिल्ली) ३–५–६७

## □ परीक्षा बंद!

हल्लीच्या युगाला कोणी कलियुग, कोणी विज्ञानयुग, कोणी अणुयुग म्हणतात. पण खरं म्हणजे हे यांपैकी कसलंच युग नाही. असलंच तर हे 'बंदयुग' आहे!

— तोंडाचा 'आ' बंद करा आधी! विस्मयचकित होण्यासारखं काय आहे ह्यात? निदान भारतात तरी सध्या 'बंदयुग'च चालू आहे! वाटल्यास जॉर्ज फर्नांडिस किंवा एस्. एम्. ना विचारा! केव्हा काय बंद करण्याची मोहीम निघेल, ते सांगता येणार नाही, इतकी 'बेबंदशाही' माजलीय् हल्ली. ह्याला अपवाद फक्त एक. बायकांचं तोंड! इथे मात्र अगदी 'बंद'– स्पेशालिस्ट पुढाऱ्यांनीही हात टेकलेत हो!

तुम्हांला आठवतंय्? मागे एका शाळेच्या मुख्याध्यापिकेनं एका चिमुरडीचं तोंड चिकटपट्टीनं बंद करण्याचा प्रयत्न केला होता! केवढा गहजब झाला त्या वेळी! यच्चयावत् अध्यापक–मुख्याध्यापकांची तोंडे बंद झाली त्यानंतर– हो! चिकटपट्टी न लावताच! मग काय बिशाद आहे विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीविरुद्ध तोंड उघडण्याची!

परंतु परवाच लखनौ येथे एका प्राध्यापकाला अवदसा आठवली. त्यानं एका गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्याला कॉपी करताना की हो पकडलं! मी म्हणतो, काही जरूर होती का? नसेल बिचाऱ्याचा अभ्यास झाला. कसा होणार? चित्रपट,

राजकारण, पत्ते, –मुलींचे आणि खेळायचे–दोन्ही...या साऱ्या ' उद्योगातून ' वेळ तरी कसा मिळावा अभ्यासाला ?– ...पण ह्या शिक्षकांना एवढा पोच कुठला ? धरलन् काय ! मग भोगा आपल्या कर्माची फळं ! मर रस्त्यावर खून !

दुसऱ्या एका ठिकाणी मात्र थोडं शहाण्यासारखं वागले शिक्षक–शाळाचालक !

परीक्षा चालू असता अंगणात एक मोटार आली आणि तिच्या लाऊडस्पीकर्स-मधून प्रश्नपत्रिकातील उत्तरे जोराजोराने सांगितली जाऊ लागली. परीक्षागृहातील विद्यार्थी (!) भरभर लिहून घेऊ लागले...

पुढे काय झाले कोणास ठाऊक ! पण त्या वेळी तरी तेथे काही अनुचित प्रकार घडला नाही. म्हणजे खून–बिन तरी निश्चितच पडला नाही. कारण त्याचा काय नेम हो ? हल्ली विद्यार्थ्यांजवळ लेखणीपेक्षा चाकूच असण्याची शक्यता अधिक ! जरा कोणी त्यांच्या स्वाभिमानाला-अस्मितेला दुखावलं की संपलंच सारं,असा मामला'

तेव्हा एक प्रेमळ सूचना– एवढं सारं ' बंद–बंद ' चाललंय् मग सगळया परी-क्षाही बंद करून टाका ना ! म्हणजे हा प्रश्न कसा चुटकीसरशी सुटेल !

' उर्दू टाईम्स

# रंगभूमी : [ पृष्ठ ५६ वरून ]

ण्याचा प्रयत्न नाटचवस्तूशी विसंगत व हास्यापद वाटतो. या दोन्ही पात्रांखेरीज पतंगे या पात्रासही नाटकात जागा नाही. अर्थात ही पात्रे वगळली असती तर नाटकाचे व्हेन बदलून निश्चित अपयश पदरी आले असते, त्या दृष्टीने नाटकामध्ये या पात्रांची आवश्यकता मान्य केली तरी या पात्रांना आवश्यकतेपेक्षा जास्त पसरू देण्याची चूक दारव्हेकरांनी केली आहे.


प्रोफेसर रंगभूमीवर असतानाच्या सर्व दृश्यांना ' फार्सीकल-टच ' आहे. नाटकाच्या एकंदर ' टोन 'शी त्याचे सुसंवादित्व सांधले जात नाही.

नाटकातील हे दोष जाणवू नयेत, निदान त्यांची तीव्रता कमी व्हावी एवढी दक्षता घेण्यात आली आहे. नाटचप्रयोग फुलवण्यासाठी फुलवा (नीलांबरी बर्वे) व प्रसाद (गोपाळ कौशिक) यांच्या गानकौशल्याचा उत्तम वापर करून घेतला आहे सरकारी स्पर्धांमध्ये काय केले यापेक्षा कसे केले याचे महत्त्व असल्याने ' रंजन कला मंदिर 'च यश मान्य करावे लागेल.

स्पर्धेच्या अंतीम फेरीमध्ये, सर्वोत्तम ठरलेला नाटचप्रयोग स्पर्धांच्या माफक दरांमध्ये सर्वत्र दाखवण्याची सरकारी योजना स्वागतार्ह म्हणावी लागेल.

–शरद गोखले

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक

दि. २० ते २६ मे : १९६७

**मेष** : सूर्य–गुरू लाभयोगाचा हा आठवडा. सारी सूत्रे सध्या त्याच्याच हाती आहेत. तो स्थावराचा प्रश्न सोडवील, वाहनांची विवंचना मिटवील, नोकराचाकरांची अनुकूलता मिळवून देईल.

याच आठवड्यात शिक्षणाची नवी दिशा ठरेल, उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र गवसेल, मंगलकार्याचा प्रश्न सुटेल. या वेळी फारशी धावपळ, धडपड न करताही अपेक्षित यश पदरी पडू शकेल.

सांपत्तिक परिस्थिती फारशी बरी नसली तरी विशेष काळजी करू नका. लौकरच कालचक्राला कलाटणी मिळेल निर्धारनिष्ठेचे व्रत मात्र भंगू देऊ नका.

दि. २१–२५–२६ मे या कालात सर्वच आशादायक व उत्साही वातावरण दिसू लागेल.

**वृषभ** : इतर ग्रहांनी तुमच्या अडी-अडचणींची फारशी दखल घेतली नाही तरी सूर्य–गुरू मात्र तुमच्याशी सतत एकनिष्ठ राहतील, ते प्रयत्नांची धार तीक्ष्ण करतील. प्रज्ञा विकसित करतील.

या वेळी स्थानांतरासाठी प्रस्थान ठेवावे लागेल, आणि स्थानांतरानंतर नव्या योजना यशस्वी करण्यासाठी अनेक संपन्न व्यक्तींचे सहकार्य घ्यावे लागेल. विज्ञान–कला–साहित्य इत्यादी

क्षेत्रांशी आपला घनिष्ठ संबंध येऊ लागेल आणि या राशीचे सिनेकलावंत तर असंख्यांच्या कौतुकाचे लक्ष्य बनतील.

या आठवड्यापासून सारे विरोधक मागील दाराने हळूच पसार होतील आणि निर्धोकपणाने प्रगतीच्या वाटेने तुमची वाटचाल सुरू होईल.

दि. २१–२४–२६ या काळावर सारे लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** कला–साहित्यांची देवता शुक्र–तीच तुमच्या राशीत प्रकटलेली आहे. तिचा वरदहस्त तुमच्यावर असल्याने आपण कला-साहित्याच्या कोणत्याही विभागात गेलात तरी तुमचा तिथे सत्कार घडेल.

तुमचा पिंड क्रांतिकारकाचा आहे. नित्याच्या तंत्रमंत्रात बदल करून काही वेगळे करून दाखवून जगाला आश्चर्याचे धक्के द्यायचे विचार या वेळी निर्माण व्हायला लागतील आणि त्या बाबतीत तुम्ही कमालीचे यशस्वीही व्हाल.

वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल, नोकरीधंद्यात अपेक्षेपेक्षाही अधिक यश, प्रतिष्ठा मिळेल. यांत्रिक-विद्युत क्षेत्रातही नेत्रदीपक यश मिळवू शकाल.

दि. २१ ते २३ येथूनच प्रगती अंकुरायला लागेल.

**कर्क :** सूर्य एकादशात आणि त्याचा तुमच्या राशीतील गुरूशी आत्यंतिक शुभ योग–दि. २१ एवढा चांगला योग पुन्हा १२ वर्षे तरी तुमच्या वाट्यास येणार नाही. त्याचे महन्मांगल्य आताच तुमच्या प्रत्ययास येईल.

समाजातील फार मोठी प्रतिष्ठा तुमच्या वाट्यास येईल, नोकरीधंद्यांत जगाने हेवा करावा असे यश मिळवाल. रासायनिक-वैद्यकीय क्षेत्रांतही या वेळी फार मोठे नाव मिळवाल.

याच आठवड्यात फार दूरच्या दौऱ्यावर निघावे लागेल. सभा–संमेलनात भाग घेण्याची संधी लाभेल आणि राजकीय वातावरणात आवाज उठवण्याचा मोका लाभेल.

दि. २१–२२–२५ मे या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**सिंह :**–सूर्य हेच तुमचे दैवत. आणि तो दशम स्थानी. एवढ्या मांडवलावरही कुठेही, कोणताही अवघड गड जिंकू शकाल. पैसा माफक मिळाला तरी पैशापेक्षा लाखमोलाची प्रतिष्ठा मिळवू शकाल.

आता विरोधकांची तोंडे बंद होतील, त्यांची कारस्थाने त्यांच्याच अंगावर उलटतील. नोकरीधंद्यात तर अनेक सहकाऱ्यांना डावलून आपण पुढे निघून जाल.

तुमच्या साऱ्या अंगीकृत कार्याला या कालापासून खूपच गती मिळायला लागेल आणि सांसारिक जीवनातील अनेक नाजूक समस्या सोडविण्यात यश मिळेल.

दि. २१–२२ हाच तुमच्या भावी यशाचा केंद्रबिंदू समजला जाईल.

**कन्या :**–सूर्य-बुध भाग्यात आणि गुरु एकादशात एक तपानंतर लाभलेली ही महान पर्वणी तुमची सारी हयात उजळून काढायला समर्थ ठरेल. दि. २१ मेपासून

सतत ७ जूनपर्यंतच्या कालात आपण अनेक क्षेत्रात विक्रम करून दाखवाल. हा आठवडा सांपत्तिकदृष्टचा फार मोठा प्रगतीचा जाणवला नाही, तरी भविष्यकालीन प्रगतीचे मार्गदर्शन करणारा आहे. साहित्यकांना, वैज्ञानिकांना, कायदेपंडितांना या वेळची गृहस्थिती असे काही देऊन जाईल की, त्याची स्मृती अनंत काल राहील. मख्यत: प्रज्ञा-प्रतिभेचा विकास हेच या वेळच्या ग्रहस्थितीचे ध्येय दिसते.

दि. २१–२३–२५ मे या कालाचे महत्त्व फारच मोठे जाणवेल.

**तूळ** :–सूर्य–मंगळांसारख्या दोन्हीही समर्थ ग्रहांनी तुमच्याकडे पाठ फिरवलेली असल्याने तुमची प्रगती रोखल्यासारखी जाणवू लागेल. तुमचा निर्धार तुमचा प्रयत्नवादच यातून मार्ग काढू शकेल. ग्रहाची अनुकूलता लाभत नाही, म्हणून निराश होण्याचे मुळीच कारण नाही. इतर कोणी नसले तरी शुक्र तुमच्या भाग्यात आहे आणि तो तुमच्याशी इमान राखून आहे.

कला–साहित्याचे क्षेत्र तुमच्या स्वागताला आतुर आहे. तिथेच तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. वैचारिक संघर्ष हळूहळू मिटायला लागतील.

दि. २१–२३–२४–२५ अपेक्षित यश याच वेळी पदरी पडावे.

**वृश्चिक** :–भाग्यस्थ गुरूला सूर्याची साथ मिळत असल्यामुळे या वेळी अक्षरश: तुमच्या भाग्याला उधाण येईल, कर्तृत्वाला धार चढेल. या वेळी आपण कुठेही गेलात काहीही केलेत तरी तिथे तुमचे सत्कार झडू लागतील. दैव कृपेचा साक्षात्कारही पदोपदी घडून यायला लागेल. थोडेसे अतिशयोक्तीने मी असेही म्हणू शकेन की. तुमचा परमोत्कर्षाचा काल हाच ! प्रतिष्ठा खूप उंचावेल, प्रतिष्ठा अफाट मिळेल.

विशेषत: यांत्रिक–वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना या वेळी नवा पर्वकाल लाभल्यासारखे जाणवेल.

राजकीय क्षेत्र तर तुमचे खास क्षेत्र. त्यात तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. सारे कर्तृत्व पणाला लावून उत्तुंग यश मिळवून दाखवाल.

दि. २१–२२–२३ सर्वोत्तम काल.

**धनू** : कसेहि वागलात आणि काहीही केलेत तरी मनासारखे काही घडूच नये अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची प्रवृत्ती. पण याही पेचप्रसंगामधून आपण चातुर्याने मार्ग काढू शकाल. चातुर्य, समयसूचकता हा तुमचा स्थायीभाव आहे. असे अनेक प्रसंग आजवर आपण पचवले आहेत. या वेळीही आपण परिस्थितीवर विजय मिळवू शकाल.

व्यापारधंद्यांत, नोकरीचाकरीत सतत सावधानता बाळगायला हवी. या वेळी अनवधानाने थोडीशीही चूक आपल्या हातून घडली तर ती क्षम्य समजली जाणार नाही. या आठवड्यात तुमच्या सहनशक्तीला आव्हान करण्यासारखे प्रसंग निर्माण होतील. पण माझे असे आपणांस सांगणे आहे की, आपण ते आव्हान स्वीकारावे. दि. २१ ते २३ या काली अनुकूल घटना घडाव्यात.

**मकर :** प्रसन्न चित्त आणि अमर आशा याच तुमच्या स्वभावामुळे आपण आजवर नेत्रदीपक यश मिळवलेत. यापुढेही निश्चितपणे मिळवाल. सूर्य–गुरु–मंगळ या ग्रहयत्रीमुळे तुम्ही अनेक क्षेत्रांत प्रतिष्ठेचे स्थान मिळवाल.

शैक्षणिक उत्तुंग यशामुळे वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल. सामाजिक यशामुळे लोकप्रियता कळसाला पोचेल. प्रतिज्ञेने यश मिळवण्याचा हा काळ आहे.

दूरचा प्रवास घडेल, राष्ट्रीय दौऱ्यावरही निघावे लागेल. मंगल कार्यात निश्चित महत्त्व लाभेल. सांपत्तिक लाभाच्या अनेक संधी समोर उभ्या राहतील. आणि त्या संधीचा आपण लाभही उठवाल.

दि. २१ ते २४ या काळी अनेक संस्मरणीय घटना घडू लागतील.

**कुंभ :** सध्या शुक्र पंचमातून जात आहे आणि त्याच्या सहकार्यामुळे आपण शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात सहसा कुणाला मिळालेले नसेल असे यश मिळवाल.

प्रकृती, मनःस्थिती मात्र फारशी चांगली राहणार नाही. आठव्या मंगळाचा पैशाअडक्यावर थोडाफार ताण पडेलच. पण या कालात आपले नाव सर्वतोमुखी गाजेल असं काही महनीय कार्य आपल्या हातून घडेल.

मंगलकार्याचे ठरेल. साहित्यात आणखी एक पाऊल पुढे पडेल. आकाशवाणीवर कार्यक्रम व्हायला लागतील. काव्य-नाटच-संगीत याही क्षेत्रात लोकप्रियता वाढेल.

मुख्यतः दि. २१ ते २३ या कालाची नोंद करा.

**मीन :** शनि-मंगळांची सहानुभूती फारशी लाभली नाही. या आठवड्यांतील सूर्य–गुरू लाभ योगामुळे तुमच्या बऱ्याचशा समस्या सुटाव्यात, घसरलेला व्यवहार सुधारावा आणि कौटुंबिक संघर्ष मिटावेत. यामुळे गेल्या कित्येक दिवसांपासून ठरवलेले स्वास्थ्य या वेळी गवसल्यासारखे वाटेल. सांपत्तिक चणचण बरीचशी कमी होईल, अनारोग्याची विवंचनाही मिटायला लागेल, आणि नोकरी धंद्यातील हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. त्यामुळे न होणारी कामेही झटपट होऊ शकतील. प्रवासाचे मात्र शक्य तो टाळा.

दि. २१–२३–२५ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा. ●

---

[ मेहेरबान : पृष्ठ ५७ वरून ]

रवीचं संगीत एकंदरीत चित्रपटाचा रडक्या 'टोन'ला साजेसे.

दिग्दर्शक भीमासिंगाऐवजी दारासिंग असता तर काही फरक पडला नसता ! जुन्याजाणत्या कलावंतांनी बहुतेक प्रसंग आपल्या रसरशीत अभिनयाने प्रभावीपणे उभे केलेच असेते; त्याचं श्रेय दिग्दर्शकाला नाही !

श्रीकृष्णाच्या हातातील फूल 'कन्हैया'च्या नेमकं हातात पडणं, नमस्कार करताच वाटेतला नाग दूर होणे . . . हे प्रकार बालिश व बायकी. एकूण चित्रपटच बायकांना खूप ऽ खूप ऽ खूप आवडेल व रडवेल असा !

—हिदायतखान

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

**१००** रुपयांची ठेव

**६** वर्षांसाठी

- 'राजहंस प्रकाशन संस्थे' कडे ठेवल्यास सुमारे सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा ग्रंथ प्रसिद्धीनंतर ताबडतोब विनामूल्य घरपोच मिळेल.

- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या **मालकीचे** हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**